POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-९४ ● मुंबई, गुरुवार, ०६ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मेट्रो, ट्विन टनल,पॉड टॅक्सी अन् बरंच काही
## घोडबंदर रोडची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सरकारचा खास प्लान

**■मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या कित्येक वर्षापासून घोडबंदर रोड येथील वाहतूक कोंडी वाढतच चालली आहे. ठाण्यातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळं त्याचा परिणाम सार्वजनिक वाहतुकीवरही होत आहे. अनेक महत्त्वाच्या रस्त्यांवर याचा ताण येतोय. त्यातीलच एक म्हणजे घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडी. तसंच, या परिसरात झपाट्याने विकास होत आहे. मोठमोठ्या इमारतींचे प्रकल्प उभे राहत आहेत. त्या अनुषंगाने प्रशासनाकडून विविध प्रकल्पांचे काम हाती घेण्यात आले आहेत. घोडबंदर रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होण्यासाठी सरकारने मास्टर प्लान आखला आहे. येथे अनेक प्रकल्पांची जोडणी देण्यात येणार आहे.



### मुंबई मेट्रो मार्गिका ४

मुंबई मेट्रो मार्गिका ही उन्नत मार्गिका असून या प्रकल्पाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. अलीकडेच एमएमआरडीएने यासंदर्भातील एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. या मेट्रो मार्गिकेमुळं वाहतुकीचा वेळ ७५ टक्कांनी कमी होणार आहे. तर, या मार्गिकेवर ३० उन्नत स्थानके आहेत. यातील कापूरबावडी येथे मेट्रो मार्गिका ५चा इंटरचेंज असेल.

### घोडबंदर रोडचे विस्तारीकरण

घोडबंदर रोडचा विस्तारचा मोठा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. घोडबंदरच्या रस्त्याचे रुंदीकरण करणार असून ७+७ असा एकूण १४ लेनचा हा मार्ग होणार आहे. या रस्त्याची नवी रचना १४ लेन असलेल्या काँक्रीट कॉरिडॉरमध्ये करण्याची योजना एमएमआरडीए आखत आहे.

### बाळकुम-गायमुख कोस्टल रोड

घोडबंदर रोडला समांतर १३.४४ किमी लांबीचा एक कोस्टल रोड बांधण्यात येत आहे. ३,३६४ कोटी रुपयांच्या बजेटसह या ४०-४५ मीटर रुंदीच्या कॉरिडॉरमध्ये पूर्व-पश्चिम मागार्साठी पयार्यी मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी व्हायाडक्ट आणि ओपन-कट विभाग असतील, ज्यामुळे घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडी लक्षणीयरीत्या कमी होईल.

### ठाणे-बोरीवली दुहेरी बोगदा

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणारा जवळजवळ १२ किमी लांबीचा हा महत्त्वाकांक्षी बोगदा आहे. एकदा का बोगद्याचे काम पूर्ण झाले की, ठाणे आणि बोरिवली दरम्यानचा प्रवास फक्त १०-१५ मिनिटांत पूर्ण होणार आहे.

### ठाणे-भाईंदरला जोडणारा बोगदा

गायमुख ते फाउंटन हॉटेल जंक्शनपर्यंतचा ५.५ किमीचा बोगदा आणि मीरा-भाईंदरला जोडणारा ९.८ किमीचा उन्नत रस्ता या दुहेरी जोडणी प्रकल्पासाठी एमएमआरडीएला निविदा मिळाल्या आहेत. अंदाजे २०,००० कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून यामुळं घोडबंदर रोडवरील गर्दी कमी होणार आहे.

### पॉड टॅक्सी

मीरा-भाईंदर आणि ठाणे परिसरात १८ ठिकाणी पॉड टॅक्सी उभारणीसाठी एमएमआरडीएकडून डीपीआर तयार करण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. पॉड टॅक्सी ही कमी जागेत उभारली जाणारी व्यवस्था आहे. त्यानुसार या पॉडकारमध्ये २० प्रवासी बसू शकतात.




### मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेले निर्णय

मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्ग, एस.व्ही.रोड आणि लिंक रोड या प्रमुख मार्गावर क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक होत असल्याने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नरिमन पाईंट ते विरारपर्यंत विविध पायाभूत सुविधांचा विस्तार आणि सुधारणा करण्यात येत आहे. याचबरोबर उत्तर दक्षिण जोडणी करत २४.३५ कि.मी.चा उत्तन-विरार सागरी सेतू बांधण्यात येणार असून तो पुढे वाढवण बंदरापर्यंत नेण्यासाठी जोडरस्ता तयार करण्यात येणार.

## मिरा-भाईंदर महापालिका प्रभाग आरक्षण सोडत ११ नोव्हेंबरला

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा-भाईंदर महापालिकेची प्रभाग रचना अंतिम झाली असून निवडणुकीसाठी महिला, ओबीसी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची प्रभाग आरक्षण सोडत ११ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता पद्मश्री नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात काढण्यात येणार असल्याची माहिती सचिव दिनेश कानगुडे यांनी दिली आहे. राज्यातील महापालिकांच्या निवडणुका लवकरच घेतल्या जाणार आहेत. यासाठी निवडणूक आयोगाकडून सर्व तयारी सुरू आहे. मिरा-भाईंदर महापालिकेकडून देखील निवडणुकीची सर्व तयारी सुरु आहे. मिरा- भाईंदर महापालिकेत २४ प्रभाग असून या प्रभागात ९५ जागा आहेत. या ९५ जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये ४८ जागा या महिलांसाठी आरक्षित राहणार आहेत. तसेच २७ टक्के ओबीसी आरक्षणानुसार २६ जागा ओबीसीसाठी राखीव



असणार आहेत. या ओबीसीसाठी आरक्षित असलेल्या जागांमध्येही ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. तसेच अनुसूचित जातींसाठी चार जागा अनुसूचित जमातींसाठी १ जागा आरक्षित आहे. या सर्व आरक्षणांसाठी सोडत काढली जाणार आहे. २०१७ च्या निवडणुकीप्रमाणेच अनुसूचित जातीसाठी प्रभाग ११, १३, १४ व १८ मधील जागाच राखीव राहणार आहेत. यामध्ये दोन जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. तर अनुसूचित जमातीसाठी प्रभाग १४ मधील एक जागा आरक्षित आहे. त्यामुळे निवडणुकीची तयारी करत असलेल्या इच्छुकांची धाकधूक वाढली आहे. आपली जागा आरक्षित झाली तर दुर्सया प्रभागातून निवडणूक लढवता येईल का? अशी तयारी देखील इच्छुकांकडून केली जात आहे.

## सेव्हन हिल्स हॉस्पिटल महापालिकेच्या ताब्यात द्या!
## अंधेरी विकास समितीचा आंदोलनाचा इशारा

**■मुंबई। प्रतिनिधी,**

अंधेरी येथील अद्ययावत सेव्हन हिल्स हॉस्पिटल उद्योगपती मुकेश अंबानी यांना देण्याचा घाट घातला जात आहे. परंतु या हॉस्पिटलचे खासगीकरण करू नये, ते मुंबई महापालिकेच्या ताब्यात द्यावे, या मागणीसाठी ६ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता हॉस्पिटलसमोर आंदोलन करण्याचा इशारा अंधेरी विकास समितीने दिला आहे.

मुंबईचे माजी उपमहापौर तथा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश शर्मा म्हणाले की, अंधेरी येथील सेव्हन हिल्स हॉस्पिटल मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे, यासाठी मागील काही महिन्यांपासून प्रयत्न केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालिका व संबंधित यंत्रणांकडे यासंदर्भात पाठपुरावा केला. परंतु मुख्यमंत्री वा अन्य यंत्रणांकडून प्रतिसाद नाही.



मुंबई महानगरपालिका आणि राज्य सरकारने सार्वजनिक गरजा लक्षात घेऊन सेव्हन हिल्स हॉस्पिटलच्या जागेत प्रगत वैद्यकीय संशोधन केंद्र आणि शिक्षणासह आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉस्पिटल म्हणून विकसित करण्याचा विचार करणे आवश्यक आहे. सेव्हन हिल्स हॉस्पिटलच्या आवारात शिल्लक असलेल्या जागेवर मेडीकल व नर्सिंग कॉलेज सुरू करता येऊ शकते, असेही शर्मा म्हणाले.

शर्मा यांनी सांगितले की, सेव्हन हिल्स हॉस्पिटलच्या जागेचा मूळ मालकी हक्क मुंबई महानगरपालिकेचा आहे. महानगरपालिकेने ही जागा सेव्हन हिल्स हॉस्पिटलला लीजवर दिली आहे. मुंबई महापालिकेने स्वतः ताब्यात घेतली तर मुंबईमध्ये आरोग्य केंद्र बनू शकते.

### हॉस्पिटलची किंमत ४ हजार कोटी?

अंधेरीतील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या हॉस्पिटलची बाजारभावानुसार ३ हजार ते ४ हजार कोटी रुपये किंमत आहे. मुंबईची वाढती लोकसंख्या लक्षात घेता त्यांच्या आरोग्य सेवांसाठी हे हॉस्पिटल एक मोठी संधी आहे, त्यासाठी सध्या असलेल्या सर्व सुविधांचा विचार करता मुंबई महानगरपालिकेने वेळ न घालवता हे हॉस्पिटल ताब्यात घेऊन मुंबईकरांना अत्याधुनिक आरोग्य सेवा देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही राजेश शर्मा म्हणाले.

## विधानसभा मतदार याद्याच ग्राह्य
## मुंबई उच्च न्यायालयात राज्य निवडणूक आयोगाची माहिती

**■मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विधानसभा निवडणुकीतील मतदार याद्याच वापरणार असल्याची माहिती मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात देण्यात आली. ही माहिती अशा याचिकेच्या सुनावणीदरम्यान देण्यात आली ज्यात १८ वर्षीय तरुणीने तक्रार केली होती की, एप्रिल २०२५ मध्ये १८ वर्षांची झाल्यानंतरही तिचा मतदार म्हणून अर्ज स्वीकारला गेला नाही.

याचिकाकर्त्या रूपिका सिंग हिने नमूद केले की, तिचा अर्ज नाकारण्यात आला कारण राज्यातील मतदार नोंदणीसाठी कट ऑफ तारीख १ ऑक्टोबर २०२४ निश्चित करण्यात आली होती. विधानसभा निवडणुका नोव्हेंबर २०२४ मध्ये झाल्या होत्या.

सिंग हिने याचिकेत म्हटले आहे की, तिच्या मतदानाच्या कायदेशीर हक्काचे उल्लंघन झाले असून, उच्च न्यायालयाने महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना तिचा अर्ज ठराविक कालमर्यादत स्वीकारून प्रक्रिया करण्याचे निर्देश द्यावेत. तिने हेही सांगितले की, याचिका निकाली



### आयोगाचा दावा

राज्य निवडणूक आयोगाचे वकील ॲड. आशुतोष कुंभकोणी यांनी न्यायमूर्ती आर. आय. छागला आणि न्यायमूर्ती फरहान दुबाश यांच्या खंडपीठासमोर सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विधानसभा निवडणुकीतील मतदार यादीच स्वीकारली जाणार आहे.

निघेपर्यंत तिचे नाव मतदार याद्यांमध्ये तात्पुरते समाविष्ट करावे, असा आदेश राज्य निवडणूक आयोगाला देण्यात यावा. सिंगच्या याचिकेत नमूद करण्यात आले आहे की, सर्व महापालिकांसाठीचा मसुदा मतदार यादी ६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. सिंगला मतदार म्हणून नोंदणी मिळाली नाही तर तिचे नाव पालिका निवडणुकीच्या मतदार याद्यांमध्ये समाविष्ट होणार नाही, असे याचिकेत म्हटले आहे.

सिंगने एप्रिल २०२५ मध्ये १८ वर्षांची झाल्यानंतर भारत निवडणूक आयोगाच्या ऑनलाइन पोर्टलवरून मतदार नोंदणीसाठी अर्ज करण्याचा प्रयत्न केला. परंतु २ ऑक्टोबर २०२४ नंतर १८ वर्षे पूर्ण झालेल्या महाराष्ट्रातील नागरिकांसाठी जन्मतारखेचा पर्याय उपलब्ध नव्हता. त्यामुळे ती अर्ज सादर करू शकली नाही. त्यानंतर तिने ऑफलाइन अर्ज करण्याचा प्रयत्न - केला. परंतु तोही स्वीकारण्यात - आला नाही, असे याचिकेत नमूद - आहे.

मतदार यानंतर तिला कळाले की, १ जुलै २०२५ हा स्थानिक संस्थांच्या निवडणुकीसाठी नोंदणीसाठी कट ऑफ तारीख म्हणून अधिसूचित करण्यात आला आहे. म्हणजेच ज्यांची नावे १ जुलै २०२५ रोजीच्या मतदार यादीत आहेत त्यांनाच मतदानाचा अधिकार मिळेल. सिंगने म्हटले आहे की, तिचा अर्ज न स्वीकारल्यामुळे तिच्या अभिव्यक्ती "मतदानाद्वारे स्वातंत्र्याचे उल्लंघन" झाले आहे. त्यामुळे ती कायदेशीरदृष्ट्या पात्र असूनही मुंबई महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदान करू शकत नाही, असेही नमूद आहे.

## महाराष्ट्रात १० जिल्ह्यांना हाय अलर्ट आयएमडीचा इशारा




**■मुंबई। प्रतिनिधी,**

मान्सूननं देशातून माघार घेतली असली तरीही महाराष्ट्राच्या काही भागांमधून मात्र पावसानं अद्यापही काढता पाय घेतला नाही. भर दिवसा, अगदी सूर्यकिरणांना दूर लोटूनही हे पावसाचे ढग येऊन क्षणात सारंकाही ओलंचिंब करून जात आहेत. ज्यामुळं आता ही रिपरिप अनेकांनाच नकोशी झाली आहे. त्यातच आजारपण आणि साथीच्या रोगांची भीती असल्यानं पावसानं आतातरी थांबावं असंच गाऱ्हाणं जो- तो घालताना दिसत आहे. मात्र पाऊस कोणापुढंही नमतं घेण्यात तयार नसल्याचं एकंदर परिस्थिती आणि हवामान अंदाज पाहता लक्षात येत आहे.

## मुंबईत ९ महिन्यांत ९८ खून
## धक्कादायक आकडेवारी जाहीर

**■कराड। प्रतिनिधी,**

मुंबईत यंदाच्या पहिल्या नऊ महिन्यांत ९८ खून झाले असून, यापैकी ११ महिला बळी ठरल्या आहेत, अशी आकडेवारी मुंबई पोलिसांनी जाहीर केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या कालावधीत खुनांच्या घटनांमध्ये २० प्रकरणांची वाढ झाली आहे. शहरातील वाढत्या हिंसक गुन्ह्यांबाबत ही चिंताजनक बाब मानली जात आहे. ही आकडेवारी समोर आली आहे ती काही दिवसांपूर्वीच, म्हणजे २४ ऑक्टोबरला झालेल्या कालाचौकीतील हत्या आणि आत्महत्येच्या प्रकरणानंतर. या घटनेत २४ वर्षीय सोनू बराई याने आपली प्रेयसी मनीषा यादव (२४) हिचा चाकूने खून करून स्वतःचा गळा चिरून आत्महत्या केली होती. अधिकृत आकडेवारीनुसार, सप्टेंबर २०२५ अखेरपर्यंत मुंबईत ९८ खून आणि २३२ खूनाच्या प्रयत्नांची प्रकरणे नोंदवली गेली. गेल्या वर्षी याच कालावधीत ७८ खून आणि २४० खूनाच्या प्रयत्नांची प्रकरणे नोंदवली होती. म्हणजेच खुनाच्या प्रयत्नांच्या घटना थोड्या कमी झाल्या असल्या, तरी खुनांमध्ये झालेली वाढ पोलीस विभागासाठी धोक्याची घंटा ठरली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, यंदा ९८ खुनांपैकी तीन प्रकरणे उघडकीस आलेली नाहीत. यंदा झालेल्या ११ महिला खून प्रकरणांपैकी १० प्रकरणे पोलिसांनी उकलली असून, आरोपींना अटक करण्यात आली आहे. गेल्या वर्षी याच काळात १८ महिलांचा खून झाला होता, म्हणजे महिलांच्या हत्यांमध्ये काही प्रमाणात घट दिसून येते. गंभीर मारहाणीच्या प्रकरणांत किंचित घट झाली आहे. गेल्या वर्षी ३,२८२ तर यावर्षी ३,०५४ अशी नोंद आहे. पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, बहुतांश खून हे झोपडपट्ट्या आणि दाट लोकवस्तीच्या भागांत घडले आहेत.




## पुण्यात रक्तरंजित थरार! ३ दिवसांत दुसरा खून, १७ वर्षांच्या मयंक खराडेची भरदिवसा निर्घृण हत्या

**■पुणे। प्रतिनिधी,**

गेल्या काही दिवसांपासून पुण्यात घडणाऱ्या घटनांमुळं शहरात नेमकं चाललंय काय? असा प्रश्न निर्माण होत आहे. काही दिवसांपूर्वीच पुण्यातील कोंढवा येथे रिक्षाचालक असलेल्या गणेश काळे याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती.त्यानंतर पुन्हा एकदा पुण्यात गँगवॉरची भडकल्याचे ठळकपणे दिसून आले. गणेश काळे याच्या हत्येनंतर आज पुन्हा एकदा शहरात रक्तरंजित थरार दिसून आला. १७ वर्षांच्या तरुणाचा भररस्त्यात कोयत्याने वार करत हत्या करण्यात आली आहे. गेल्या तीन दिवसांतील हा दुसरा खून असल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

पुण्यात आंदेकर आणि कोमकर गँगवॉर प्रकरणाने एकच खळबळ उडाली आहे. या घटनेने शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पुण्यात भरदिवसा खुनाचं सत्र सुरूच असल्याचं पाहायला मिळतंय. पुण्यातील मध्यवर्ती भाग असलेल्या बाजीराव




रोडवर मयंक खराडे नामक व्यक्तीची हत्या झाल्याची प्राथमिक माहिती आहे. गेल्या ३ दिवसांत झालेला हा दुसरा खून आहे. या खुनाच्या घटनेचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस तपास करत आहेत.

मंगळवारी दुपारी ३.१५ वाजण्याच्या सुमारास अभिजित इंगळे व त्याचा मित्र मंयक खरारे हे त्यांच्या दुचाकीवरुन जात होते. तेव्हा महाराण प्रताप उद्यानाच्याजवळ दखनी मिसळच्या समोर अचानक जनता वसाहतमधील तीन तरुणांनी त्यांना आडवले.त्यानंतर मयंक खरारे यांच्यावर हल्ला केला. तीनही हल्लेखोरांनी तोंडावर मास्क लावला होता.त्यानंतर तिघांनी मयंक खराडे याच्या डोक्यात व तोंडावर शस्त्राने वार केले. या हल्ल्यात मयंक या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे.

प्राथमिक माहितीनुसार हा तरुण अंबीलवाडा परिसरात राहणारा होता, त्याची हत्या कोणत्या कारणाने करण्यात आली आहे, याची माहिती घेण्यासाठी पोलिसांनी तपासचक्र फिरवली आहेत. पुण्यातला बाजीराव रस्ता हा प्रचंड रहदारी असलेला रस्ता आहे. या रस्त्याच्या मध्यभागी मयांक खराडे या व्यक्तीची भरदिवसा हत्या करण्यात आली आहे. त्यामुळे पुण्यात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

## विरारमधील तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी ५ जणांना अटक, ७ जणांविरोधात गुन्हे

**■विरारे। प्रतिनिधी,**

विरारच्या मनवेलपाडा येथे २० वर्षीय महाविद्यालयीन तरुणीने केलेल्या आत्महत्येप्रकरणी विरार पोलिसांनी एकूण ७ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. त्यापैकी ५ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यात एका अल्पवयीन मुलीचाही समावेश आहे. अन्य दोन फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

विरार पूर्वेच्या मनवेल पाडा येथील नाना नानी पार्क परिसरातील शिव शंभो अपार्टमेंटमध्ये ऋचा पाटील ही २० वर्षीय तरूणी आई-वडिलांसोबत राहत होती. ती विरार पश्चिम येथील विवा कॉलेजमध्ये बी.कॉम. मध्ये शिकत होती. त्याच कॉलेजमध्ये शिकणार्या अमित दिनेश प्रजापती नावाच्या विद्याथ्यासीबत तिचे प्रेमसंबंध होते. ते प्रेमसंबंध तुटले होते. अमित तिला ब्लॅकमेल करत होता. घटनेच्या दोन दिवस आधी कॉलेजमध्ये दोघांमध्ये कोणत्यातरी कारणावरून वाद झाला. ती कॉलेजमधून बाहेर पडत असताना, अमितचा मित्र शिवा प्रल्हाद मदेसिया याने तिला अडवले आणि अमित जे सांगतो आहे, ते मान्य करण्यास सांगितले. यावरून ऋचाचा त्याच्याशीही वाद झाला.

तिने ही बाब आपल्या वडिलांना सांगितली. १३ ऑक्टोबर रोजी ऋचा तिच्या वडिलांना घेऊन प्राचार्यांकडे तक्रार करण्यासाठी कॉलेजला गेली होती. पण प्राचार्य उपस्थित नव्हते. त्यावेळी अमित प्रजापती, शिवा, राकेश पाल, कृष्णा गुप्ता, एक अल्पवयीन मुलगी आणि इतर दोन तरुण कॉलेजमध्ये पोहोचले. ऋचाच्या वडिलांनी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ते ऋचाबद्दल उलटसुलट बोलू लागले. यामुळे संतापून ऋचाच्या वडिलांनी अमितला कानाखाली मारली. वाद इतका वाढला की, तिथे खूप गोंधळ झाला. सर्वजण ऋचा आणि तिच्या वडिलांना शिवीगाळ करू लागले. त्यांनी विरोध केल्यावर त्या आरोपींनी ऋचाच्या वडिलांना मारहाण केली. या घटनेमुळे ऋचा खूप दुःखी झाली. ती वडिलांना घेऊन घरी आली. त्यानंतर तिने इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली.

या प्रकरणी पोलिसांनी ७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यापैकी अमित प्रजापती, शिवा मदेसिया, राकेश पाल, कृष्णा गुप्ता यांना अटक करण्यात आली आहे. तर अल्पवयीन मुलीला भिवंडी येथील बाल सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. इतर दोन आरोपींचा शोध सध्या सुरू आहे.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# नितीशकुमार बिहारचे एकनाथ शिंदे होणार!



बिहारमध्ये वरवर पाहता एनडीए विरुद्ध महागठबंधन अशी लढाई होत आहे. खरी गोष्ट तर ही आहे की, भाजप नितीशकुमारांच्या जेडीयूला संपवण्याच्या प्रयत्नात आहे. भाजपलाच वाटत आहे की जेडीयूच्या जागा कमी आल्या पाहिजे. चिराग पासवानच्या उमेदवारांना जेडीयूचे मतदार खरंच मतदान करणार का, हाही प्रश्न आहे. नितीशकुमारांच्या विरोधात हाच खेळ खेळला जात आहे. भाजपकडून सम्राट उर्फ राकेश चौधरी यांना पुढे केले जात आहे. मोदी-शहांनी त्यांना मुख्यमंत्री करायचे ठरवले असेल तर नितीशकुमार यांचा एकनाथ शिंदे होणार अशी चर्चा सध्या बिहारमध्ये सुरू आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील दिग्गज आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांसोबतच काँग्रेसचे अनेक नेते बिहारमध्ये आश्वासनांची बरसात करून आले आहेत. दुर्सया टप्प्यातील मतदान 11 नोव्हेंबरला आहे. तोपर्यंत ही बरसात अशीच सुरू राहणार आहे. बिहार हे पूरप्रवण राज्य आहे, सध्या आश्वासनांचाही पूर वाहतोय. गेल्या २० वर्षांपासून येथे नितीशकुमार मुख्यमंत्री आहेत. कधी भाजपच्या पाठिंब्यावर तर मधल्या काळात महागठबंधनच्या पाठबळावरही त्यांचे सरकार तगले होते. विधानसभा निवडणूक थेटपणे दोन आघाड्यांमध्ये होत आहे. नितीशकुमार यांचा जनता दल (यूनायटेड) (जेडीयू), भारतीय जनता पक्ष (भाजप), चिराग पासवान यांची लोक जनशक्ती पार्टी (रामविलास पासवान), आणि हिंदुस्तानी आवाम मोर्चा (हम) या तीन पक्षांसह राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) विरुद्ध तेजस्वी यादवांचा राष्ट्रीय जनता दल (आरजेडी), काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी-लेनिनवादी) लिबरेशन, विकासशील इन्सान पार्टी (व्हीआयपी) आणि इतर छोटे पक्ष यांचे महागठबंधन यांच्यात होत आहे. यामध्ये एक्स फॅक्टर असलेले दोन नवे भिडू आहेत. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर हे त्यांच्या जन सुराज या पक्षासह लढत आहेत. तर काही सीमित संसाधनांसह उत्तर प्रदेशातील भीम आमीर्चे चीफ खासदार चंद्रशेखर हे आझाद समाज पार्टीसह मैदानात उतरले आहेत. निवडणुका घोषित होण्यापूर्वी नितीशकुमार सरकारने मुख्यमंत्री महिला रोजगार योजना घोषित केली. राज्यातील पात्र महिलांना स्वयंरोजगार देण्यासाठी १० हजार रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जात आहेत. २९ ऑगस्टला योजनेची सुरुवात झाली आणि आतापर्यंत दीड कोटी महिलांनी यासाठी अर्ज दाखल केले. त्यांच्या खात्यात १०-१० हजार रुपये जमा झाले आहेत. पूर्णतः अनुदानित असलेल्या या दहा हजार रुपयांत महिलांनी छोटा-मोठा उद्योग, कुक्कुटपालन, शेळीपालन सुरू करावे, आर्थिक आत्मनिर्भर व्हावे असा योजनेचा उद्देश आहे. निवडणुकीच्या तोंडावर योजना सुरू करण्यात आली, यावरून योजनेचा उद्देश स्पष्ट होतो. आप आणि काँग्रेसने अशा योजना सुरू केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांना रेवडी म्हटले होते, हे आता लोकस्मृतीतून गेले आहे. दहा हजार रुपये घेऊन जेडीयू-भाजपला मतदान केल्यास तुम्ही यापुढे इंदिरा आवास योजना, अंगणवाडीतील पोषण आहार यांसारख्या योजना विसरा, असा सूचक इशारा प्रशांत किशोर यांनी दिला आहे. महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजनेमुळे महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश यांची काय स्थिती झाली याचेही दाखले ते देत आहेत. महागठबंधनचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांनी प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला सरकारी नोकरीचे आश्वासन दिले आहे. एनडीएची महिलांच्या खात्यात थेट पैसे जमा करण्याची योजना उलटफेर करत असल्याचे लक्षात आल्यानंतर आता त्यांनी आमचे सरकार आल्यास ३० हजार रुपये देऊ असे आश्वासन दिले आहे. एनडीएचे घोषणापत्र जाहीर झाले तेव्हा एकाही नेत्याने त्या संकल्पपत्रात काय आश्वासन दिले याची माहिती दिली नाही. यावरूनच एनडीएमधील समन्वय समोर आला. या घोषणापत्रात अनेक घोषणा अशा आहेत ज्या केंद्र सरकारही अद्याप पूर्ण करू शकलेले नाही. परकीय गुंतवणूक आणण्याचे आश्वासन त्यापैकीच एक. एकीकडे अमित शहा म्हणतात की बिहारमध्ये नवीन उद्योग उभारण्यासाठी जमीन नाही आणि दुसरीकडे परकीय गुंतवणूक आणण्याचे आश्वासन दिले जाते. यातील आणखी विरोधाभासी चित्र आहे की, काही कार्पोरेट घराण्यांना कवडीमोल भावात शेतकर्यांच्या जमिनी देण्यात आल्या. त्यातून कार्पोरेट उद्योग वाढणार, त्यांचे खिसे बिहारी जनताच त्यांची महागडी वीज खरेदी करून भरणार, असेही उद्योग सुरू आहेत. याची माहिती नितीशकुमारांना नाही का? पण ते सध्या अशा मुद्द्यांवर काहीही बोलत नाहीत. मुख्यमंत्रीपदावरही ते काहीही बोलत नाहीत. भाजपचा कोणत्याही राज्यात प्रचाराचा मुख्य मुद्दा हा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण? असाच राहिला आहे. महाराष्ट्रानंतर बिहार हे दुसरे राज्य आहे जिथे भाजप या प्रश्नापासून दूर पळत आहे. नितीशकुमारही सांगायला तयार नाहीत की तेच पुन्हा मुख्यमंत्री होतील की नाही. मागील निवडणुकीत त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, ही माझी शेवटची निवडणूक आहे, तसेही ते आता सांगत नाहीत. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे भाजपने अखेरपर्यंत मुख्यमंत्रीपदाचा निर्णय निकालानंतर घेण्याचे ठरवले, तसेच काही बिहारमध्ये होताना दिसत आहे. कमी जागा असूनही नितीशकुमार यांना भाजपने सरकार स्थापनेसाठी पाठिंबा दिला. मात्र आता तेच आमचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा आहेत, असे भाजपचा एकही नेता सांगत नाही. भाजपबद्दल उद्धव ठाकरे यांनी म्हटलेले आहे की, हा पक्ष मित्रपक्षांना 'वापरा आणि फेकून द्या!' या भावनेने वागतो. त्याची प्रचिती आता नितीशकुमार यांना येत असणार. भाजपकडून सम्राट उर्फ राकेश चौधरी यांना पुढे केले जात आहे. नितीशकुमार यांनीदेखील त्यांना मंत्री म्हणून त्यांचे काम चांगले असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. नरेंद्र भय्या आणि नितीश भय्या यांच्या नेतृत्त्वात बिहारने खूप काही मिळवले आहे, अजून बरेच काही बिहारमध्ये करून दाखवायचे असे आता ते सांगायला लागले आहेत. सम्राट चौधरी हे नितीश सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आहेत. त्यांचे वडील शकुनी चौधरी सात वेळा आमदार आणि एकदा खासदार राहिलेले आहेत. राजकीय घराण्यातच ते वाढले. २०१७ मध्ये त्यांचा भाजपमध्ये प्रवेश झाला. सुरुवातीला मंत्री, भाजप प्रदेशाध्यक्ष अशी वेगाने त्यांची पक्षात प्रगती झाली. भाजपच्या कोट्यातून उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले. यामागे जातीय समीकरण अधिक महत्त्वाचे आहे. कोइरी (कुशवाह) या ओबीसी वगार्तून ते येतात. बिहारमध्ये भाजपचा आतापर्यंत मुख्यमंत्री झालेला नाही. गेल्या तीन दशकात जेपी आंदोलनातून पुढे आलेल्या नितीशकुमार आणि लालू प्रसाद यादव यांच्या भोवतीच बिहारचे राजकारण फिरत राहिलेले आहे. आता भाजपला मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीपर्यंत घेऊन जाणारा चेहरा सापडला आहे. ओबीसी एकत्रीकरणाच्या कार्यक्रमात त्यांनी चौधरींना जवळ केले आणि मुख्यमंत्री पदाचा आगामी काळातील चेहरा यादृष्टीने तयारी सुरू केली. नितीशकुमार यांच्या एनडीएमधील घरवापसीला सम्राट चौधरींचा विरोध होता. मात्र भाजपमध्ये नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याशिवाय तिर्सया कोणाच्या मताला किती महत्त्व असणार. पण नितीश सरकारमध्ये त्यांनी उपमुख्यमंत्री पद सांभाळले आणि आता नितीशकुमार जाहीर सभांतून त्यांचे कौतुक करू लागले आहेत. ३० ऑक्टोबरच्या जाहीर सभेत अमित शहांनी सम्राट चौधरींना विजयी करा, नरेंद्र मोदी त्यांना बडा आदमी करणार असे म्हटले. यावरून त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या दाव्याला अधिक बळ मिळत आहे. विरोधकांकडून सम्राट चौधरींवर गंभीर आरोप होत आहेत. प्रशांत किशोर यांच्या पक्षाने त्यांच्या विरोधात उच्च विद्याविभूषित उमेदवार दिला आहे. चौधरींवर सात खुनांचा आरोप असल्याचा त्यांचा दावा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना याची माहिती नाही का, असाही ते सवाल करतात. त्यांच्या वय आणि शिक्षणाबद्दलही प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र जेव्हा मोदी-शहांनी त्यांना मुख्यमंत्री करायचे ठरवले असेल तर नितीशकुमार यांचा एकनाथ शिंदे होणार अशी चर्चा सध्या बिहारमध्ये सुरू आहे. वरवर बिहारमध्ये एनडीए विरुद्ध महागठबंधन अशी लढाई होत आहे. खरी गोष्ट तर ही आहे की भाजप जेडीयूला संपवण्याच्या प्रयत्नात आहे. भाजपलाच वाटत आहे की जेडीयूच्या जागा कमी आल्या पाहिजे. चिराग पासवानच्या उमेदवारांना जेडीयूचे मतदार खरंच मतदान करणार का, हाही प्रश्न आहे. लोकांना पोलिटिकल अँटी इन्कम्बन्सी समजते, मात्र त्यांना सोशल अँटी इन्कम्बन्सी कळत नाही. याचाच फायदा भाजप उचलण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा काँग्रेस नेते कन्हैय्या कुमार यांनी केला आहे. नितीशकुमारांच्या विरोधात हाच खेळ खेळला जात आहे. भाजप त्यांना २०२० मध्ये संपवण्याच्या प्रयत्नात होती. तेव्हाच म्हटले गेले होते की, नितीशकुमार यांना भाजपचे दरवाजेच नाही तर खिडक्या देखील बंद आहेत. मात्र नंतर असं काय घडलं की भाजपनेच त्यांच्यासाठी पायघड्या टाकल्या. कमी आमदार असूनही त्यांना मुख्यमंत्रीपद दिले? भाजपचे नेतेही म्हणाले की, आम्ही आमच्या छातीवर दगड ठेवून नितीशकुमारांना मुख्यमंत्री म्हणून स्वीकारले आहे.

# कर्मचाऱ्यांना अच्छे दिन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी सत्तेवर येताना आपण देशवासीयांसाठी अच्छे दिन आणू अशी ग्वाही दिली होती. त्यानुसार त्यांनी प्रत्येक क्षेत्रात काम सुरू केले आणि आता शेती, बेरोजगारी आणि गरिबीविरोधात जोरदार जंग पुकारतानाच त्यांनी सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा केली. आयोगात एक अध्यक्ष, एक अर्धवेळ सदस्य आणि एक सदस्या सचिव असतील आणि या आयोगाचे प्रमुख न्यायमूर्ती रंजना देसाई असतील. अरुण जेटली अर्थमंत्री असताना जेव्हा सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला तेव्हा त्यांनी म्हटले होते, की सरकारी कर्मचारी आणि खासगी कर्मचाऱ्यांमध्ये वेतनात प्रचंड तफावत आहे. ती दूर करण्यासाठी सातवा वेतन आयोग लागू केला जात आहे. आता आठवा वेतन आयोग लागू होत आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना या आयोगाच्या शिफारशींचा लाभ होण्याबरोबरच त्यांच्या मनात खासगी कर्मचाऱ्यांबाबत जी विषमतेची आणि असूयेची भावना असायची ती आता बरीच दूर होईल. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी १-१-२०२६ पासून लागू होतील अशी अपेक्षा आहे. ५० लाख सरकारी कर्मचारी आणि ६९ लाख निवृत्त कर्मचारी योजनेचा लाभ घेऊ शकतील. वेतन आयोगाच्या शिफारशींचा लाभ देशाची आर्थिक परिस्थिती आणि आर्थिक शहाणपणा यांचा ताळमेळ घालून देण्यात येईल. या शिफारशीमुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनात सरासरी ३० ते ३४ टक्के वाढ होईल आणि संभाव्य महागाई भत्ता मूळ वेतनात विसर्जित होईल. अर्थात राज्यसरकारांना केंद्राच्या धोरणाचे अनुकरण करावे लागेल आणि काही राज्ये सक्षम असतील. पण त्यांना केंद्राच्या मागे जावेच लागेल आणि त्यांच्यासाठी दुसरा पर्याय नसेल. फिटमेंट फॅक्टरवर नवी रचना अवलंबून असेल हा फिटमेंट फॅक्टर म्हणजे मूळ वेतनाला गुणून काढला जातो. या शिफारशींचा प्रमुख परिणाम केंद्र सरकारवर होईल कारण त्याला पगारवाढ आणि इतर आनुषंगिक खचार्चा ताळमेळ इतर सरकारी योजना आणि त्यावर होणाऱ्या खर्चाशी घालावा लागेल. या आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा तत्काळ परिणाम म्हणजे आर्थिक वाढ होऊन उपभोगाचे प्रमाण वाढेल आणि त्यामुळे अर्थचक्राचे गाडे सुरळीत राहील. आठवा वेतन आयोग लागू झाल्यावर कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात लक्षणीय वाढ होणार असून महागाई भत्त्यात तसेच प्रवास भत्ता लक्षणीय वाढेल. यामुळे मागणी वाढेल आणि अर्थचक्र सुरळीत धावू लागेल. या वेतन आयोगाची मागणी सरकारी कर्मचारी अनेक दिवसांपासून करत होते आणि आता त्यांच्यात उत्सुकता निर्माण झाली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही घोषणा केली आणि सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये चैतन्याची लाट उसळली. कारण कर्मचाऱ्यांचा मूळ पगार ५० हजार रुपये असेल तर घरभाडे भत्ता २४ टक्के दराने आणि टीए म्हणजे प्रवास भत्ता ५५ टक्के दराने २७, ५०० रुपये तर सध्याचे वेतन ९१०० रुपये असेल तर त्या कर्मचाऱ्याचे एकूण वेतन १ लाख १५ हजार रुपये होईल. याचा अर्थ सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात १२ टक्के वाढ केली जाईल. सर्वसाधारण मत असे आहे, की आठवा वेतन आयोग लागू होईल तेव्हा त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यावर होईल आणि महागाईचा परिणाम कमी होईल. याचा थेट परिणाम केंद्र सरकारवर होईल आणि ते लाखो कर्मचाऱ्यांच्या मतांवर प्रभाव टाकू शकेल. अर्थात कोणते ही सरकार हेच करते आणि याबाबत मोदीच नाही, तर या पूर्वीच्या काँग्रेस सरकारने हाच कित्ता गिरवला आहे. या पगारवाढीचा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. कर्मचाऱ्यांच्या हातात जास्त पैसा येईल आणि त्यामुळे ते अधिकाधिक खर्च करू शकतील. कारण त्यांची क्रयशक्ती वाढून ते उपभोगाच्य वस्तूंवर खर्च करू शकतील. येत्या निवडणुकीत केंद्राला याचा लाभ होईल आणि तो अपरिहार्य घटक आहे. कारण कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यांना नाराज करून चालू शकत नाही. अर्थात राज्य सरकारांना सरकारी कर्मचाऱ्यांची वेतन वाढ करावी लागेल आणि त्यांना याचा फटका बसू शकतो. महाराष्ट्रासारखे प्रगत राज्य सोडले तर इतर राज्ये बरीच मागास आहेत. त्यांना यथा शक्ती कर्मचाऱ्यांना पगारवाढ द्यावीच लागेल. अर्थात या शिफारशी अमलात आणतानाच सरकारला सावधानता बाळगावी लागेल ती म्हणजे आर्थिक शिस्त पाळावी लागेल. ज्या योजना नॉन कॉन्ट्रीब्युटरी आहेत त्यांवर फेर तपासणी करून आवश्यक वाटल्यास त्या बंद कराव्या लागतील. अर्थात यावर विरोधकांचे सूर उमटतील कारण सरकारकडे पैसा नाही तर इतक्या सरकारी कर्मचाऱ्यांना वेतन वाढ का द्यायची आणि इतकी वेतनवाढ द्यायची तर सरकार त्यासाठी पैसा कुठून आणणार हे त्याचे नेहमीचे प्रश्न असतील. पण विरोधकांच्या कोल्हेकूईला काही अर्थ नाही. कारण प्रत्येक सरकारला आपल्या कर्मचाऱ्यांचे हित पाहावेच लागते आणि अन्य योजना चालू ठेवाव्याही लागतात. त्यामुळे या विरोधकांच्या म्हणण्याला काही अर्थ नाही. सरकारला ही तारेवरची कसरत करावीच लागते आणि मोदी सरकारनेही ती केली. वेतन आयोगाच्या घोषणेनंतर ७३ दिवसांनी आता आठवा वेतन आयोग कर्मचाऱ्यांच्या दृष्टीपथात आला आहे. विरोधकांनी आठवा वेतन आयोग लागू करण्यास विलंब का असा सरकारला सवाल केला आहे. या विलंबामुळे सरकारी कर्मचारी नाराज आहेत, असा त्यांचा दावा आहे. पण आता केंद्राने घोषणा केली आहे आणि २०२७ पासून ती पगारवाढ अमलात येत आहे. त्यामुळे विरोधकांची हवा गेली. मोदी यांनी सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी दिली आहे आणि आता पुढील निवडणुकीत त्याचा परिणाम दिसू लागेल असे दिसते. सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ झाल्यामुळे आता अच्छे दिन येतील. त्यामुळे सरकारी लोकांचे बल्ले बल्ले होईल.

# सांप्रदायिक सलोखा जपणे आवश्यक

**अल्पसंख्यांकांवर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये वाढ होत असताना सामाजिक सौहार्द कायम राखण्यासाठी काम करणे आत्यंतिक गरजेचे आहे. त्याचवेळी पोलिसांनी तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे. अर्थात यासाठी राजकीय इच्छाशक्तीचीही तितकीच गरज आहे.**

फुलाचे दुकान लावण्यास वारंवार अटकाव केल्याने नैराश्य आल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तरुणाने २९ ऑक्टोबर रोजी आपल्या घरातच पहाटे गळफास लावून आत्महत्या केली. सावंतवाडी तालुक्यातील बांदा मुस्लीम वाडीतील आफताब कमरुद्दीन शेख या ३८ वर्षीय तरुणाने आत्महत्येपूर्वी व्हिडिओ करून आपल्या आत्महत्येला बांदा शहरातील पाचजण जबाबदार असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी बांदा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आफताबचे बांदा बाजारपेठेत फुलांचे दुकान आहे. आठ महिन्यांपूर्वी दुकान लावताना, शहरातील काही तरुणांनी त्याला दुकान लावण्यास अटकाव केला. त्यानंतर तब्बल आठ महिने त्याला व्यवसाय करु दिला नाही. दरम्यान, आता जत्रेचा सीझन चालू झाल्यामुळे त्याने पुन्हा आपले दुकान सुरू केले. मात्र त्यातल्याच काही लोकांनी, आफताबला पुन्हा व्यवसाय करू देणार नाही अशी भूमिका घेतली. ''आपण व्यवसाय करू शकत नसल्यामुळे घरची परिस्थिती हलाखीची झाली आहे. आपल्या बायकामुलांचे हाल होत आहेत. त्यामुळे आता माज्यासमोर कोणताही पर्याय नाही, म्हणून मी आत्महत्या करत आहे. माज्या मुलांना सांभाळा'', अशी भावनिक व आर्त हाक आफताबने व्हिडिओमार्फत घातली आणि आत्महत्या केली. त्यात त्याचे निधन झाले.

आफताबने व्हिडिओत उल्लेख केल्याप्रमाणे त्याच्या आत्महत्येला बांदा येथील पाचजण जबाबदार आहेत. त्यांना पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा व त्यांना अटक करावी. जोपर्यंत त्यांना अटक केली जात नाही तोपर्यंत पोस्टमार्टेमसाठी नेलेला मृतदेह आम्ही ताब्यात घेणार नाही, असा इशारा आफताबच्या नातेवाईकांनी पोलिसांना दिला. त्यांच्या म्हणण्यानुसार, सावंतवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास आधी नकार दिला. पोलिसांवर बहुधा दवाब असावा. वारंवार विनवणी करून सुद्धा पोलीस दखल घेत नाहीत. त्यामुळे काही झाले तरी आम्ही माघार घेणार नाही, अशी रास्त भूमिका आफताबच्या नातेवाइकांनी त्यानंतर घेतली. पत्रकारांशी संवाद साधताना त्याचे भाऊ अब्दुल रजा म्हणाले, ''नैराश्यातून आफताबने आत्महत्या केली आहे. वारंवार संबंधित चार-पाच जणांकडून त्याच्यावर दबाव येत होता, त्यामुळे आफताबने हा प्रकार केला. त्यामुळे काही झाले तरी माज्या भावाच्या आत्महत्येला कारणीभूत ठरणाऱ्या संबंधितांवर कारवाई केल्याशिवाय माघार घेता येणार नाही.''

या घटनेनंतरही स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात येत नसल्यामुळे या प्रकरणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले होते. त्यामुळे, 'आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्यांविरोधात तातडीने गुन्हा दाखल करून संबंधितांना न्याय मिळवून द्या व सदरचा कारवाई अहवाल सादर करा', असे आदेश राज्य अल्पसंख्यांक आयोगाने जिल्हा पोलीस अधीक्षकांना १ नोव्हेंबर रोजी दिल्यावर अखेरीस चक्रे फिरली आणि २ नोव्हेंबरच्या रात्री आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम ३०७ खाली गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेने संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा आणि परिसरातील संवेदनशील नागरिकांना अस्वस्थ केले होते. मानवी संवेदना जपणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या मनात या घटनेबाबत दुःख, शोक, संताप आणि न्यायाच्या अपेक्षा आहेत. या घटनेचा सखोल आणि निष्पक्ष तपास व्हावा, दोषींवर कायद्यानुसार योग्य कारवाई व्हावी आणि भविष्यात कोणालाही अशाप्रकारचा



सांप्रदायिक अन्याय व भेदभाव सहन करावा लागू नये, हीच सर्वांची अपेक्षा आहे. म्हणूनच सर्व धर्मीय समाजघटक, सामाजिक संघटना आणि सजग नागरिकांनी एकत्र येत सर्वधर्मीय शांतता अभियानाचे आवाहन केले आहे. नागरिकांनी वेळ पडल्यास ओरोस येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे मोर्चा काढण्याची तयारी सुरु केली होती. संविधान, न्याय आणि मानवतेच्या मूल्यांवर उभ्या असलेल्या लोकशाही राष्ट्रातील 'आम्ही भारतीय' या संविधानिक मूल्यांवर काम करणाऱ्या नागरिकांनी आयोजित केलेला हा मोर्चा पूर्णपणे अहिंसात्मक, संविधानसंमत आणि शांततेचा संदेश देणारा असेल, अशी तयारी आयोजकांनी सुरू केली होती. कायदा आपले काम करेल. आम्ही न्यायावर आणि संविधानावर पूर्ण विश्वास ठेवतो! मोर्चा काढण्याची वेळ आमच्यावर आणू नका, असे आयोजकांचे म्हणणे अखेरीस पोलिसांनी मान्य केले असले तरी न्यायासाठी अजूनही प्रयत्न सुरूच ठेवावे लागतील, याची जाणीव कार्यकर्त्यांना आहे.

प्रत्येक धर्माच्या समाजघटकास आणि नागरिकाला येथे समान न्याय आणि सन्मानाने वागण्याचा अधिकार आहे. या मूल्यांवर काम करणारा ह्यआम्ही भारतीयह्ल हा मंच सावंतवाडी, सिंधुदुर्ग भागात गेले कित्येक वर्ष सलोख्याचे काम करत आहे. देशात व राज्यातही सर्वत्र द्वेषाचे वातावरण पसरत असताना विशेषतः कोकणात सामाजिक सलोखा टिकून राहिला आहे, असे वाटत होते. असे असताना बांद्यातील ही व अशा इतर घटना अस्वस्थ करणाऱ्या आहेत. महाराष्ट्राच्या सीमेवरील व गोव्याच्या बाजूलाच असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात खरे तर हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन सहजीवन सहज पाहायला मिळते. मात्र 'ते' आणि 'आपण' अशी दुही समजात माजवू पाहणाऱ्यांकडून धार्मिक धृवीकरणाचे जे संविधानविरोधी प्रयत्न सुरू आहेत; त्यामुळे हे सहजीवन उद्ध्वस्त होण्याचा धोका वाढतो आहे.

महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी सध्या सामाजिक सलोखा मोडीत काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. समाजात तणाव आणि वैमनस्य निर्माण व्हावे या हेतूने, धार्मिक आणि जातीय विद्वेष झपाट्याने पसरवण्याचे काम सुरू आहे. अशा वेळी 'अमन के हम रखवाले, हम एक है', या भावनेने समाजात मिसळत संवाद वाढवण्याची गरज आहे. विकासाच्या मुद्याऐवजी धार्मिक द्वेषाचे वातावरण निर्माण करणाऱ्यांवर सरकार आणि प्रशासनाने योग्य ती कायदेशीर कारवाई करून, या देशातील संविधानिक हक्कांचे व मूल्यांचे तसेच सामाजिक शांतता आणि सलोखा यांचे रक्षण करण्याची मागणी करणारे नागरिक एकत्र येत आहेत, ही जमेची बाजू आहे.

समाजात शांतता आणि सौहार्द राखण्यासाठी कटिबद्ध असलेल्या जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय(एनएपीएम)ने समाजातील सौहार्द, शांतता, बहुविधता, एकात्मता व धर्मनिरपेक्षता केवळ टिकून राहण्यासाठीच नाही, तर वृद्धिंगत व्हावी, यासाठी 'सद्भाव मंच' स्थापन केला असून, देशात अनेक ठिकाणी तो कार्यरत आहे. सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षतेची ताकद उभी व्हावी, यासाठी सद्भाव मंचातर्फे अनेक प्रयत्न केले जात आहेत. दंगली, झुंडबळी, धार्मिक व जातीय दडपशाहीच्या घटना घडू नये यासाठी समाजात सौहार्दवृद्धीचे अनेक उपक्रम राबविले जात आहेत. विसंवाद वाढवणारे हिंसक प्रकार घडल्यास अशा ठिकाणी तातडीने धावून जाण्याचे कामही सुरू आहे. सद्भाव अडचणीत असताना अशा हस्तक्षेपाच्या कामाबरोबरच सत्यशोधनाचे काम आवश्यक आहे. कारण त्यामुळे या मुद्द्यावर धोरण ठरवताना त्याचा उपयोग होऊ शकतो, हे लक्षात घेऊन सद्भाव मंच अशा कामात सक्रीय आहे. घटनांची माहिती घेण्यासाठी सत्यशोधन समिती स्थापन करणे, घटनेचा निःपक्षपाती अहवाल तयार करणे, सामाजिक सलोखा व निर्भयतेने जगण्याच्या अधिकाराची मागणी व अंमलबजावणीचा आग्रह शासन-प्रशासनाबरोबर होणाऱ्या मुद्याधारित चर्चेत धरणे, ह्या दृष्टीनेही सद्भाव मंच काम करत आहे.


पुण्यातील फरीद शेख आणि त्यांचा मुलगा फैजान शेख यांच्यावर २ ऑक्टोबरला झालेल्या हल्ला प्रकरणात, आरोपींना अद्याप अटक झालेली नाही. पोलिसांवर दबाव येत असेल तर राज्यकर्त्यांनी यात लक्ष घालून, असे होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. लोकशाहीत मतभेद असणार. विविध घटकात चालीरीतींमध्ये वैविध्य राहणार. अशावेळी, ह्यसांप्रदायिक विविधता, त्यात अनोखी एकताह्ल, हे भारताचे वैभव टिकवण्यासाठी, सांप्रदायिक सलोखा जपणे आवश्यक आहे!

लाचे दुकान लावण्यास वारंवार अटकाव केल्याने नैराश्य आल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तरुणाने २९ ऑक्टोबर रोजी आपल्या घरातच पहाटे गळफास लावून आत्महत्या केली. सावंतवाडी तालुक्यातील बांदा मुस्लीम वाडीतील आफताब कमरुद्दीन शेख या ३८ वर्षीय तरुणाने आत्महत्येपूर्वी व्हिडिओ करून आपल्या आत्महत्येला बांदा शहरातील पाचजण जबाबदार असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी बांदा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आफताबचे बांदा बाजारपेठेत फुलांचे दुकान आहे. आठ महिन्यांपूर्वी दुकान लावताना, शहरातील काही तरुणांनी त्याला दुकान लावण्यास अटकाव केला. त्यानंतर तब्बल आठ महिने त्याला व्यवसाय करु दिला नाही. दरम्यान, आता जत्रेचा सीझन चालू झाल्यामुळे त्याने पुन्हा आपले दुकान सुरू केले. मात्र त्यातल्याच काही लोकांनी, आफताबला पुन्हा व्यवसाय करू देणार नाही अशी भूमिका घेतली. ''आपण व्यवसाय करू शकत नसल्यामुळे घरची परिस्थिती हलाखीची झाली आहे. आपल्या बायकामुलांचे हाल होत आहेत. त्यामुळे आता माज्यासमोर कोणताही पर्याय नाही, म्हणून मी आत्महत्या करत आहे. माज्या मुलांना सांभाळा'', अशी भावनिक व आर्त हाक आफताबने व्हिडिओमार्फत घातली आणि आत्महत्या केली. त्यात त्याचे निधन झाले.

आफताबने व्हिडिओत उल्लेख केल्याप्रमाणे त्याच्या आत्महत्येला बांदा येथील पाचजण जबाबदार आहेत. त्यांना पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा व त्यांना अटक करावी. जोपर्यंत त्यांना अटक केली जात नाही तोपर्यंत पोस्टमार्टेमसाठी नेलेला मृतदेह आम्ही ताब्यात घेणार नाही, असा इशारा आफताबच्या नातेवाईकांनी पोलिसांना दिला. त्यांच्या म्हणण्यानुसार, सावंतवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास आधी नकार दिला. पोलिसांवर बहुधा दवाब असावा. वारंवार विनवणी करून सुद्धा पोलीस दखल घेत नाहीत. त्यामुळे काही झाले तरी आम्ही माघार घेणार नाही, अशी रास्त भूमिका आफताबच्या नातेवाइकांनी त्यानंतर घेतली. पत्रकारांशी संवाद साधताना त्याचे भाऊ अब्दुल रजा म्हणाले, ''नैराश्यातून आफताबने आत्महत्या केली आहे. वारंवार संबंधित चार-पाच जणांकडून त्याच्यावर दबाव येत होता, त्यामुळे आफताबने हा प्रकार केला. त्यामुळे काही झाले तरी माझ्या भावाच्या आत्महत्येला कारणीभूत ठरणाऱ्या संबंधितांवर कारवाई केल्याशिवाय माघार घेता येणार नाही.''

....बाकी पुढील अंकात

# क्षेत्र व क्षेत्रज्ञ



हे जे शरीर आहे, त्याला क्षेत्र म्हणतात आणि याला जो जाणतो, त्याला क्षेत्रज्ञ म्हणतात. या विषयातील जाणकार हे जाणतात, 'की हे शरीर म्हणजे क्षेत्र असून, त्याला जाणणारा क्षेत्रज्ञ आहे...' गीतेत तेराव्या अध्यायाच्या सुरुवातीला आलेला अर्जुनाचा प्रश्न प्रकृती, पुरुष, क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञान, ज्ञेय या क्रमाने आहे. श्रीकृष्णांनी उत्तर मात्र क्षेत्र आणि क्षेत्रज्ञापासून सुरू केले आहे. ज्याप्रमाणे आपण परीक्षेत सोपे प्रश्न अगोदर लिहायला घेतो आणि मग कठीण प्रश्न घेतो; तसेच भगवान श्रीकृष्ण आपल्याला समजायला सोपा विषय सुरुवातीला घेत आहेत. शरीराबद्दल आपण जाणतो. माझा हात, माझे डोके, माझे दुःख, माझी तहान, माझी भूक, माझी झोप इत्यादी. आपण समजत असतो, म्हणून या शरीरापासून, ज्याला 'क्षेत्र' म्हटले आहे, त्यापासून भगवंत उत्तर देत आहेत. 'क्षियते इति क्षेत्रम्' अशी त्याची संस्कृत उत्पत्ती आहे. जो क्षियमान आहे, ज्याचा क्षय होतो, त्याला क्षेत्र म्हणतात. 'क्षियते इति शरीरम्' म्हणजेच जे नष्ट होते, ते शरीर. 'देह' हा शरीरासाठी आणखी एक शब्द आहे. 'देहः - द'ते इति देहः' तीन तापाने जो जळत असतो, तो देह. आपण जिवंत असेपर्यंत आपल्याला आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक हे तीन ताप जाळत असतात. आध्यात्मिक ताप म्हणजे, जो आपल्या शरीराच्या आतून निर्माण होतो. उदा. - कोणताही आजार, ताप, खोकला, कॅन्सर इत्यादी. आधिभौतिक ताप हा अन्य जीव, प्राण्यांमुळे होणारा आहे. उदा. साप चावणे, कुत्रा चावणे इत्यादी. आधिदैविक ताप, म्हणजे भूकंप, पूर येणे इत्यादी. असे हे तीन ताप आपल्याला, या शरीराला भोगावे लागतात. मृत्यूपश्चातही शरीरास जळावेच लागते, म्हणून क्षेत्र, शरीर आणि देह हे तीन शब्द शरीरासंबंधी आहेत. क्षेत्र म्हणजे शेत हा त्याचा दुसरा अर्थ. हे शरीर एखाद्या शेताप्रमाणेच आहे. या शेतात आपले कर्म बियाण्याचे काम करते. आपण शरीरात कर्माचे बियाणे पेरत असतो. अशा कर्माच्या पेरण्याने, त्यापासून सुख-दुःख ही फळे प्राप्त होतील, या अपेक्षेने जगत असतो. कर्माचे फळ मिळण्यासाठी देह हे माध्यम आहे. देहच नसता, तर कमार्ची सुख-दुःख ही फळेही प्राप्त झाली नसती, म्हणून देह म्हणजे शेत, क्षेत्र, ज्यात सुख-दुःख ही फळे प्राप्त होतात.



# प्रत्येक आजारावर खात असाल 'पेनकिलर' तर वेळीच सावध व्हा

आजकालच्या आपल्या लाईफस्टाईलमध्ये आपलं शरीर हे मशीनसारखंच काम करत राहातं. रात्री किमान ८ तासाची व्यवस्थित झोप मिळू शकेल याचीही खात्रीही नसते. या सगळ्या गोष्टींमुळे डोकेदुखी, पोटदुखी अथवा कधीकधी शरीरामध्ये पेटके येणं ही अतिशय साधारण बाब झाली आहे. यापूर्वी बऱ्याचदा या सगळ्यापासून सुटका मिळण्यासाठी घरगुती उपाय केले जायचे त्याची जागा आता मात्र एक पेनकिलर घेतली आहे. आयुष्याच्या या धावपळीत आपल्याला जाणवत असलेला त्रासही आपल्याला लगेच बरा करायचा असतो. अशावेळी बरेच जण प्रत्येकवेळी पेनकिलरचा आधार घेतात. पेनकिलर हा सर्वात चांगला आणि सोपा उपाय सर्वांना वाटतो. पण तुम्हाला माहीत आहे का ही सवय सर्वात वाईट सवय ठरू शकते? कशी ते आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. तुम्ही जर सतत पेनकिलर घेत असाल तर हे नक्की वाचा आणि वेळीच सावध व्हा. पेनकिलरची सवय लागली असेल तर वेळीच व्हा सावध एक पेनकिलरने तुमचा त्रास नक्कीच कमी होतो. डोकेदुखीपासून ते कंबरदुखी, पोटदुखी, पायाचा त्रास या सगळ्यातून लवकर सुटका मिळवायची असेल तर नक्कीच तुम्हाला सर्वात पहिले समोर काय दिसत असेल तर पेनकिलर. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मेडिकल स्टोअर्समध्ये डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय तुम्हाला ही पेनकिलर विकत घेता येते. मग अगदी जरासं डोकं दुखलं तरीही काही जण पेनकिलरचा आधार घेतात. पण तुमची ही सवय तुमच्यासाठी नुकसानदायी ठरू शकते. यामुळे तुम्हाला तुमच्या शरीरावर घातक परिणाम सहन करावे लागतात.

**पोटदुखीचा त्रास :** बऱ्याचदा मासिक पाळीच्या दिवसात होणाऱ्या पोटदुखीपासून सुटका मिळवण्यासाठी मुली पेनकिलरचा आधार घेतात. कधी कधी ठीक आहे पण प्रत्येक महिन्यात अशी सवय लावून घेणं चुकीचं आहे. पेनकिलरचं जास्त सेवन हे पोटामध्ये गॅसची समस्या निर्माण करतात. तसंच यामुळे सतत तुम्हाला जळजळ, आंबट ढेकर येणं आणि उलटी होणे याचाही त्रास होण्याची शक्यता वाढते.

**लिव्हरवर प्रभाव :** पेनकिलरची सवय आपल्या लिव्हरवर खूपच वाईट परिणाम करते. अधिक प्रमाणात पेनकिलरचं सेवन केल्यास, लिव्हरचे सेल्स तुटण्याची भीती असते आणि त्यामुळे भूक कमी लागणं हे सर्वात मोठं लक्षण दिसून येतं. तुम्हाला अशी समस्या निर्माण झाली तर तुम्ही त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घेण्याची गरज आहे अन्यथा त्याचा लिव्हरवर अधिक वाईट परिणाम होण्याची शक्यता असते.

**वजन वाढण्याची समस्या :** पेनकिलर प्रमाणापेक्षा अधिक खाल्ल्यास, तुमचं वजन वाढण्याचीही शक्यता असते. तुम्ही नेहमी पेनकिलर घेत असाल तर तुम्हाला वजनामध्ये नक्कीच फरक जाणवेल. तुम्ही पेनकिलर घेणं कमी करा. पण असं करत असाल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायलाही विसरू नका.

**कॉन्स्टिपेशन अथवा लूज मोशन्स :** तुम्ही जी पेनकिलर घेत आहात ती तुमच्या शरीराला प्रत्येकवेळी सूट करेलच असं नाही. बऱ्याचदा पेनकिलरच्या सेवनाने तुम्हाला कॉन्स्टिपेशन अथवा लूज मोशन्सच्या त्रासालाही सामोरं जावे लागू शकतं याची माहिती करून घ्या.

**रिकाम्या पोटी कधीच घेऊ नका :** रिकाम्या पोटी पेनकिलर घेण्याने तुमच्या शरीरामध्ये गॅस आणि ॲसिडिटीचं प्रमाण अधिक वाढतं. त्यामुळे तुमची तब्बेत अधिक बिघडण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे पेनकिलर घेण्याआधी तुम्ही काहीतरी खाल्लेलं असणे अत्यंत गरजेचं आहे.

## आमटीचे धिरडे



**साहित्य :** १ कप आमटी, १/२ कप पाणी (टीप), धिरड्याचे पीठ (तांदळाचे, ज्वारीचे, असे मिक्स पीठ), चवीनुसार मिरचीची पेस्ट, १/२ टिस्पून लसूण पेस्ट (ऐच्छिक), १/२ टिस्पून जीरे, चवीनुसार मीठ, तेल.

**कृती :** आमटी एका वाडग्यात घ्यावी. त्यात धिरड्याचे पीठ आणि जीरे घालून मिक्स करावे. आवश्यकतेनुसार पाणी घालावे. चव पाहून मीठ आणि मिरचीपेस्ट घालावी. हवी असल्यास लसूण पेस्ट घालून मिक्स करावे. मिश्रण थोडे पातळसर असायला हवे म्हणजे धिरडे कुरकुरीत होते. नॉनस्टीक तवा तापवून त्यावर तेल घालावे. तवा चांगला तापला कि डावेने भिजवलेले पीठ घालून धिरडे घालावे. मध्यम आचेवर, कडेने तेल सोडून एक बाजू व्यवस्थित होवू द्यावीत. कालथ्याने बाजू बदलावी आणि दुसरी बाजूसुद्धा भाजावी. तयार धिरडे चटणीबरोबर सर्व्ह करावे.

# उच्चरक्तदाब व्याधीग्रस्तांसाठी कॉफी धोकादायक

उच्चदाब अनेक व्याधींचे कारण ठरत असले तरी यामुळे हृदयरोगाचा अधिक धोका असतो. या पार्श्वभूमीवर आरोग्यतज्ज्ञ रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचा सल्ला देतात. नियमित व्यायाम आणि पोषक आहार हे त्यासाठी उपयुक्त ठरते, असे तज्ज्ञांचे मत आहे. योग्य आहार नसेल तर रक्तदाब वाढण्याचा धोका असतो. या व्याधीग्रस्तांनी आहारात सोडियमचे प्रमाण कमी करावे, तसेच अधिक कॉफी पिणे टाळावे, असे नुकत्याच केलेल्या एका संशोधानात स्पष्ट झाले. जपानी संशोधकांच्या म्हणण्यानुसार रक्तदाब धोकादायक पातळीवर असेल तर एका दिवसात दोन किंवा त्यापेक्षा अधिक कप कॉफी ही रक्तदाब वाढवण्यास कारण ठरते. अमेरिकेतील ह्यहार्ट असोशिएशनह्णच्या संशोधनानुसार मद्य हेदेखील रक्तदाब वाढण्याचे एक कारण आहे. या व्याधीग्रस्तांसाठी तर मद्य अधिक धोकादायक आहे. मद्याचा विपरीत परिणाम हृदय, मूत्रिपड, यकृतावरही होतो. त्यामुळे मद्यपानापासून दूर राहण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात.

# लवंग भिजवून खाल्ल्याने 'हे' ७ त्रास वेगाने होतात दूर?



डायबिटीज असल्यास तुमच्या आहाराकडे विशेष लक्ष देण्याचा सल्ला दिला जातो. आपल्या नियमित आहारात पण असे काही पदार्थ असतात ज्यांच्यामुळे स्वादुपिंडात इन्सुलीनचे उत्पादन होण्याचा वेग मंदावतो. परिणामी ब्लड शुगर एकाएकी बूस्ट होण्याचा धोका असतो. जर डायबिटीजवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर आपले हृदय, मेंदू, डोळे, किडनी, असे सर्वच अवयव धोक्यात येतात. तज्ज्ञांच्या माहितीनुसार डायबिटीजच्या रुग्णांसाठी त्यांच्या किचनमधील हा एक मसाल्याचा पदार्थ चमत्कारिक ठरू शकतो. आहारात या मसाल्याचा समावेश केल्यास डायबिटीज नियंत्रण सोप्पे होऊ शकते. हा जादुई मसाला कोणता व त्याचे नेमके काय फायदे आहेत? तसेच नियमित आहारात आपण त्यांचा कसा समावेश करू शकतो हे आता आपण पाहुयात..

एम्स रुग्णालयाचे माजी सल्लागार व साओल हार्ट सेंटरचे संस्थापक डॉ. बिमल झांजेर सांगतात की, डायबिटीजच्या रुग्णांसाठी लवंगाचे अगदीच फायदेशीर ठरू शकते. या मसाल्याचे ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो. तसेच यामुळे ब्लड शुगरही नियंत्रणात राहू शकते.

**डायबिटीज नियंत्रणात लवंग कशी करते मदत?**

- अँटी डायबिटिक व अँटी -इंफ्लेमेटरी गुणसत्व असणाऱ्या लवंगांमुळे इंसुलीनचा स्तर नियंत्रित राहतो .
- अँटी ऑक्सिडंट्स पॅनक्रियाजमध्ये इन्सुलिन तयार करण्याचा वेग वाढवतात.
- लवंगांमध्ये व्हिटॅमिन सीचा मुबलक साठा असतो. यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

**लवंगाचे शरीराला अन्य फायदे**

- लवंग पाण्यात भिजवून ठेवल्यास ते पाणी प्यायल्याने पचनप्रक्रिया सुद्धा वेगवान होऊ शकते. तुम्हाला जर शौचास साफ न होण्याची समस्या असेल तर लवंगाच्या पाण्याने नक्कीच मदत होऊ शकते.
- लवंगाचे सेवन तुमच्या शरीरातील जंत बाहेर काढून टाकण्यास मदत करतात.
- प्रवासात मळमळ जाणवत असेल तर लवंगाचे सेवन फायदेशीर ठरते.
- दृष्टी कमजोर झाली असल्यास सुद्धा लवंगाच्या सेवनाने फायदा होऊ शकतो.
- दातदुखीवर सुद्धा लवंग परिणामकारक आहे.
- थंडीच्या दिवसात सतत कफ होत असल्यास लवंगाचे सेवन करून आराम मिळू शकतो.

**डायबिटीज रुग्णांनी लवंगाचे सेवन कसे करावे?**

ब्लड शुगर नियंत्रणात ठेवण्यासाठी डायबिटीजच्या रुग्णांनी एक ग्लास पाण्यात ८ ते १० लवंगा बिजवून ठेवाव्यात, नंतर हे पाणी उकळून थंड करून ठेवावे. हे पाणी प्यावे व नरम झालेल्या लवंगा सुद्धा चघळून एक एक करून खाऊ शकता.

# कॉफी फेस-पॅक



कॉफी ही आपल्या त्वचेच्या समस्यांकरता देखील तितकीच फायदेशीर आहे. होयं हे खरयं कॉफीच्या या गुणधर्मांविषयीची माहिती खूपच कमी लोकांना आहे. मात्र, हे अगदी खर आहे. कॉफीमध्ये अनेक पोषकद्रव्ये आणि तत्वांचा समावेश आहे. त्यामुळे ही कॉफी आपल्या त्वचेसाठी, टाळूसाठी आणि केसांसाठी खूपच लाभदायी आहे.

एका अभ्यासात हे समोर आलं की, कॉफी ही त्वचेला हेल्दी बनवते. कॅफीइक एसिड हे असे ॲन्टी ऑक्सिडेंट आहे, जे कोलेजन लेव्हल वाढवते. यामुळे एक प्रकारे तुमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडत नाही. आता अनेक ब्युटी प्रोडक्टमध्ये कॉफीचा वापर होत आहे. यासोबतच व्हिटॅमिन- ई देखील फायदेशीर आहे.

हिवाळ्यामध्ये त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते. सामान्य त्वचा, कोरडी त्वचा आणि सेन्सिटिव्ह त्वचा हे त्वचेचे तीन प्रकार आहेत. थंडीमध्ये जर तुम्ही केमिकल्स असणाऱ्या प्रोडक्टचा वापर केला तर तुम्हाला रॅश येणे आणि त्वचा कोरडी पडणे या समस्या जाणवतील. त्यामुळे जर तुम्हाला स्किनवर ग्लो आणायचा असेल तर तुम्ही या कॉफी फेस पॅकचा वापर करू शकता. हा फेसपॅक तुम्ही घरच्या घरी तयार करू शकता.

**कॉफी फेस पॅक कसा तयार करायचा?**

कॉफी फेस पॅक तयार करण्यासाठी कॉफी मध, दूध आणि हळद पावडर एका वाटीमध्ये घेऊन मिक्स करा. त्यानंतर एका ब्रशने किंवा हाताने मिक्स केलेला हा पॅक चेहऱ्यावर लावा. पॅक १० मिनीटे चेहऱ्यावर ठेवा. त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धूतल्यानंतर टॉव्हेलने चेहरा पुसा.

कॉफी फेस पॅक लावायचे फायदे

१) त्वचेवरील डेड सेल्स जातील.
२) चेहऱ्यावर ग्लो येतो.
३) चेहऱ्यावरील डाग निघून जातात.

# लिव्हर खराब होण्याचा धोका वाटतोय? तर ओव्याचे पाणी ठरेल रामबाण औषध



लिव्हर हा आपल्या शरीराचा एक महत्त्वाचा भाग आहे जो रक्त शुद्ध करतो आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकतो. तेलकट-मसालेदार अन्न, तूप, लोणी, मलईदार दूध आणि मटण यासारखे आहार घेतल्यास फॅटी लिव्हर होऊ शकते किंवा लिव्हरच्या आजारांचा धोका वाढू शकतो. अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे लिव्हर खराब होण्याचा धोका देखील वाढतो.

लिव्हर मध्ये बिघाड झाला की त्याची लक्षणे शरीरात दिसू लागतात. भूक न लागणे, उलट्या होणे, झोप न लागणे, दिवसभर थकवा आणि आळस येणे, जलद वजन कमी होणे ही लिव्हरच्या समस्यांची लक्षणे असू शकतात. लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी आहाराची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी ओवा खूप प्रभावी ठरतो. ओवा किचनमध्ये उपलब्ध असलेला असा मसाला आहे जो औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. यामध्ये भरपूर मात्रा मध्ये तेल असते. जे अनेक बायोएक्टिव्ह संयुगे बनलेले आहे. या तेलामुळेच त्याचे औषधी महत्त्व अधिक आहे. ओवा हा एक मसाला आहे जो पाचक फायबरचा चांगला स्त्रोत आहे. त्यामुळे आतड्याचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. ओव्यामध्ये जबरदस्त उपचारात्मक गुणधर्म आहेत. औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या ओव्याचा वापर लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी खूप प्रभावी ठरतो. आयुर्वेद तज्ज्ञ आचार्य बालकृष्ण यांच्या मते, ओव्याचे पाणी उकळल्यानंतर त्याचा वापर केल्यास लिव्हरच्या आजारांपासून आराम मिळतो. ओवा लिव्हर कसे निरोगी ठेवते आणि त्याचे सेवन केल्याने कोणते रोग बरे होतात ते जाणून घेऊया..

**ओव्याचे पाणी लिव्हर बरे करण्यासाठी प्रभावी आहे**

जर तुम्ही जास्त मद्य प्यायले असेल किंवा अल्कोहोल प्यायल्याने लिव्हर खराब झाला असेल तर तुम्ही ओव्याचे पाणी प्यावे. दारूच्या व्यसनापासून मुक्त होण्यासाठी ओव्याचे पाणी देखील प्रभावी आहे. ओव्याच्या पाण्याचे नियमित सेवन केल्याने लिव्हरचे कार्य सुरळीत होण्यासह अन्नातून पोषक तत्वांचे शोषण वाढण्यास मदत होते.

ओव्याचे पाणी बनवण्यासाठी १०० ग्रॅम ओवा घ्या आणि ८०० मिली पाण्यात ते पाणी २५० मिली पर्यंत कमी होईपर्यंत उकळा. हे पाणी गाळून बाटलीत भरून ठेवा आणि दररोज जेवणापूर्वी एक कप पाणी प्या. याचे सेवन केल्याने लिव्हर निरोगी राहते आणि दारूच्या व्यसनातूनही सुटका होते.

**ओव्याचे पाणी हृदय निरोगी ठेवते**

अँटी-ऑक्सिडंट गुणधमार्ने समृद्ध असलेले ओव्याचे पाणी हृदयरोग्यांसाठी वरदान आहे. अँटिऑक्सिडंट खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित करते आणि हृदय निरोगी ठेवते.

# नाकाचे सौंदर्य खुलवायचे, तर नक्की करा असा प्रयोग



आपण बऱ्याच अभिनेत्रींनी नाकाची सर्जरी केल्याचं ऐकतो. बऱ्याच जणींना आपलं नाक बेढब वाटतं. मग अशावेळी नक्की काय करायचं? त्यासाठी आपण मेकअपची मदत घेऊ शकतो. जाड किंवा बेढब नाक हे अनेकांसाठी अडचण ठरू शकते. पण असे नाक असेल तरीही आपण ते सुंदर आणि सुबक करू शकतो. मेकअप करून आपण आपल्या नाकाचं सौंदर्य खुलवू शकतो. पण त्यासाठी नक्की काय करायचं हे आपण या लेखातून पाहणार आहोत. काही जणांच्या नाकाचा आकार हा चेहऱ्याच्या आकारानुसार नसतो. त्यावेळी नक्की काय करायचं? काही जणांना आपल्या नाकाचा आकार अजिबातच आवडत नसतो. त्यामुळे काही जणी सर्जरीचा पर्यायही निवडतात. पण याशिवाय अनेक पर्याय आपल्याकडे असतात. आपण या लेखातून हेच पर्याय पाहणार आहोत.

**१. नोज पिन अथवा नथ बदल**

आपलं नाक जर बेढब असेल अथवा नाकाचा आकार नीट वाटत नसेल तर आपण जी नोज पिन घालतो अथवा कोणत्याही कार्यक्रमामध्ये आपण जी नथ घालणार असतो तो आपण बदलू शकतो. यासाठी तुम्ही तुमच्या ब्युटिशियनचा सल्ला घेऊ शकता अथवा तुमच्या घरातील व्यक्तींना फॅशनबद्दल समज असेल तर तुमच्या नाकाच्या आकाराला कोणत्या प्रकारची नोज रिंग अथवा नथ सुटेबल होते आहे हे विचारून घ्या. आपल्या नाकामध्ये जाड अथवा बारीक नथ चांगली दिसते आहे की नाही हे दोन्ही नीट बघून घ्या. या पद्धतीने नाकाचा बेढब आकार तुम्ही सुधारू शकता. तुमच्या नाकाचा आकार अधिक चांगल्या प्रकारे उठून दिसतो.

**२. जाड नाकासाठी वापरा कॉन्टूर मेकअप**

काही जणींचे नाक हे जाड असतं. पण हे नाक जर तुम्हाला छोटं दाखवायचे असेल तर मेकअपमधील कॉन्टूरचा आपण उपयोग करून घेऊ शकतो. बऱ्याच जणांना कॉन्टूर कसं लावायचं याची माहिती नसते. कारण कॉन्टूर लावणे ही एक प्रकारची कला आहे. तुम्ही कॉन्टूर कसं वापरायचं हे एकदा शिकून घेतलं तर तुम्ही आपल्या नाकासाठी याचा योग्य वापर करू शकतो. यामध्ये सहसा मॅट ब्रॉन्झचा वापर करण्यात येतो. चेहरा उजळत नाही तर तुमचा फेसकट व्यवस्थित दिसतो.

**३. हेअरस्टाईल्सचा घ्या आधार**

ज्यांचे नाक मोठे असते ते लहान आणि टोकदार दिसण्यासाठी तुम्ही वेगवेगळ्या हेअरस्टाईल्सदेखील करू शकता. हेअरस्टाईल्सच्या काही प्रकाराने तुम्हाला तुमच्या नाकाचा आकार लपवता येतो आणि तुम्हाला नाक टोकदार दाखवायचे असेल तर तुम्ही केस एका बाजूला करू शकता. यासाठी तुम्ही उजव्या बाजूला तुमचा भांग पाडा आणि डाव्या बाजूला अधिकाधिक केस मोकळे सोडा. तुमचे केस जर कुरळे असतील तर तुम्हाला ही हेअरस्टाईल अधिक सुंदर दिसेल आणि नाक अधिक सुंदर दिसू शकेल. नाक जर बसकं अथवा चपट असेल तर तुम्ही अशा वेगवेगळ्या हेअरस्टाईल्सचा उपयोग करू शकता.

**४. ब्लशर अथवा फाऊंडेशनचा वापर करा**

नाक अधिक चपट अथवा जाड असेल तर तुम्ही चमचमत्या अर्थात ब्लश करणाऱ्या ब्लशर अथवा फाऊंडेशनचा वापर तुम्ही करू शकता. नाकाच्या दोन्ही बाजूला तुम्ही डार्क फाऊंडेशन लावा आणि मधल्या भागात नाक टोकदार दिसण्यासाठी लाईट फाऊंडेशनचा वापर करा. हे लावताना तुम्ही ब्रशचा वापर करा. त्यानंतर नाकाच्या हाडावर तुम्ही हायलायटरचा वापर करा जेणेकरून नाक शार्प दिसेल आणि तुम्हाला अगदी आकर्षक नाक दिसायला हवं असेल तर त्यामध्ये कन्सिलरचा वापर करा. तुम्हाला नाक आकर्षक दिसण्यासाठी अथवा नाकाचं सौंदर्य खुलविण्यासाठी अशा पद्धतीचा वापर करता येऊ शकतो.

# केसांना अधिक घनदाट, लांब आणि चमकदार बनवण्यासाठी वापरा मुलतानी माती



केस हा आपला सर्वात जास्त जिव्हाळ्याचा विषय. केसांची गळती, फ्रिजी होणं, कोरडे होणं, तेलकट दिसणे, कोंडा होणं यासारख्या समस्यांना सर्वांनाच सामोरं जावे लागतं. याची कारणे अनेक असतात. पण यामुळे अधिक ताण येतो. पण तुम्हाला माहीत आहे का चेहऱ्याच्या उजळपणापासून ते त्वचेच्या अनेक समस्या सोडविणारी मुलतानी माती आपल्या केसांना अधिक घनदाट, लांब आणि चमकदार बनवण्यासाठी फायदेशीर ठरते. याचे घरच्या घरी हेअरपॅक बनवून तुम्ही केसांच्या समस्या सोडवू शकता. मुलतानी मिट्टीचा वापर कसा करायचा हेदेखील आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. कारण कोणतेही हेअरपॅक तयार करताना कोणत्या गोष्टीचा किती वापर करायचा हेदेखील महत्त्वाचे असते. त्यामुळे कोणत्या गोष्टीमध्ये मुलतानी माती घालून त्याचा केसांसाठी वापर कसा करायचा आणि केसांच्या कोणत्या समस्येवर मुलतानी माती कशी वापरायची याची इत्यंभूत माहिती.

**१. केसगळतीसाठी**

केसगळतीसाठी आपण अनेक उपाय करून बघतो. मुलतानी मातीचा वापरही आपण करू शकतो. त्यासाठी एका बाऊलमध्ये दोन चमचे मुलतानी माती घाला. त्यात १ चमचा दही मिसळा आणि १ टी स्पून काळी मिरी पावडर मिक्स करा. पाणी घालून याची व्यवस्थित पेस्ट बनवून घ्या. ब्रश अथवा हाताच्या बोटांनी तुमच्या केसांच्या मुळापासून ही पेस्ट लावा आणि अर्धा तास तशीच राहू द्या. त्यानंतर साध्या पाण्याने केस धुवा. हा हेअरपॅक तुम्ही आठवड्यातून एक वेळा वापरू शकता. याचा चांगला परिणाम तुम्हाला दिसून येईल.

**२. विखुरलेल्या (फ्रिजी) केसांसाठी**

बऱ्याच जणांचे केस फ्रिजी असतात. अशावेळी तुम्ही २ चमचे मुलतानी माती घ्या. त्यामध्ये एक अंडं आणि १ चमचा दही मिक्स करा. त्यानंतर त्यामध्ये १ चमचा नारळाचं तेल मिसळा आणि हे सर्व मिश्रण एकत्र मिसळून त्याची पेस्ट करा. ही पेस्ट स्काल्पवर लावा आणि अर्ध्या तासाने साध्या अर्थात गार पाण्याने केस धुवा. अंड्याचा वास केसांमध्ये राहू नये यासाठी पाण्यात एक लिंबाचा रस पिळून घ्या आणि त्या पाण्याने आंघोळ करा आणि ५ मिनिट पाणी ओतल्यानंतर तसेच राहा. त्यानंतर पुन्हा आंघोळ करा.

**३. कोरड्या केसांसाठी**

कोरड्या केसांवर कोणत्याही प्रकारची हेअरस्टाईल केली तरी त्याचा लुक चांगला दिसत नाही. पण तुम्हाला जर तुमच्या कोरड्या केसांमध्ये चमक आणि नवी जान आणायची असेल तर तुम्ही नैसर्गिकरित्या आपल्या केसांमध्ये चमक आणू शकता. त्यासाठी तुम्ही १ चमचा मुलतानी माती घ्या त्यात १ चमचा तिळाचं तेल आणि एक चमचा दही मिसळा. हे नीट मिक्स करून ही पेस्ट स्काल्पवर लावून साधारण २० मिनिट्स तशीच ठेवा. त्यानंतर केस नीट धुवा. हा हेअरपॅक तुम्ही आठवड्यातून दोन वेळा नक्की ट्राय करा. त्यामुळे तुमचे केस नक्कीच मऊ मुलायम आणि चमकदार होतील.

**४. तेलकट स्काल्पसाठी**

तेलकट स्काल्पमुळे केस अधिक चिकट दिसतात. त्यावर अधिक प्रमाणात धूळ साचते. या समस्येपासून सुटका मिळविण्यासाठी मुलतानी मातीचा पॅक नक्कीच उपयोगी ठरतो. ४ चमचे मुलातानी मातीमध्ये एका लिंबाचा रस पूर्ण पिळून घ्या. हे नीट मिक्स करा आणि केसांना लावून साधारण २० मिनिट्स लावा. नंतर साध्या पाण्याने धुवा आणि नैसर्गिकरित्या केसांना सुकू द्या. तुमच्या केसातील तेलकटपणा आपोआप कमी होईल.

**५. केसांच्या वाढीसाठी**

केसांना मजबूत आणि लांबसडक बनवायचे असेल तर तुम्हाला मुलतानी मातीचा वापर अधिक फायदेशीर ठरू शकतो. त्यासाठी तुम्ही मुलतानी मातीसह रिठा पावडर मिक्स करा. त्यात पाणी घालून त्याती व्यवस्थित पेस्ट करून घ्या. ही पेस्ट केसांच्या मुळापासून लावा. त्यानंतर अर्धा तास केस तसेच ठेवा. नंतर साध्या पाण्याने केस व्यवस्थित धुवा. हा हेअरपॅक तुम्ही आठवड्यातून किमान तीन वेळा लावा आणि मग त्याचा परिणाम पाहा. तुमची केसगळती थांबून तुमचे केस लांबसडक होण्यास याची नक्कीच मदत होते.

# वन खात्याच्या बोटचेप्या धोरणाचा फटका

## आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटीसह अनेकांवर परिणाम

**नवी मुंबई विमानतळ क्षेत्रातील जमिनींची सद्यस्थिती**

- मौजे उलवेः विमानतळ हद्दीत, खाडी लगत व रस्त्यालगतची जमीन
- मौजे सोनखारः विमानतळाबाहेर, नाल्यालगत, सेक्टर २३ उलवे परिसर
- मौजे तारघरः मोहा गावाशेजारी, अंबुजा सिमेंट कंपनीजवळ, डीएफएफसी मार्गाजवळ
- मौजे दापोलीः पुष्पक नोड, सेक्टर ३, ५, ६, ९, १० – जेएनपीटी रोड परिसर
- मौजे कोपरः उरणझपनवेल रोडलगत, खाडी जवळ, विमानतळ हद्दीत



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

सिडकोच्या बहुचर्चित जमीन वाटप प्रकरणावरून वनखात्याने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे आता नवी मुंबईतील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या प्रकल्पांवर संकटाचे ढग निर्माण झाले आहेत. वनखात्याने या प्रकरणाचा वापर नगरविकास विभागावर राजकीय कुरघोडी करण्यासाठी केल्याचा आरोप होत असून, या तणावाचा फटका केंद्र आणि राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कोन्शिअस फोरम या संस्थेने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील मोठ्या प्रमाणातील राखीव वनजमीन बेकायदेशीररित्या खासगी व्यक्तींच्या ताब्यात गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ही जमीन पुन्हा वनविभागाच्या ताब्यात द्यावी आणि याबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत जमीन स्थिती कायम ठेवावी अशी मागणी करण्यात आली आहे.

मात्र, या याचिकेतील माहिती दिशाभूल करणारी असल्याचा दावा जमीन लाभार्थी यशवंत बिवलकर यांनी केला आहे. त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले की, संबंधित जमीन कोणत्याही प्रकारे वनखात्याच्या अखत्यारीत नाही. त्यांनी माहिती अधिकारातून सिडकोकडून मिळवलेल्या नोंदी सादर करत, ही जमीन सिडकोच्या विमानतळ विकास योजनेअंतर्गत संपादित झाल्याचे दाखवले आहे.

सिडकोने दिलेल्या माहितीनुसार, उलवे, कोपर, सोनखार, तारघर आणि दापोली येथील जमिनी विमानतळ, रस्ते आणि औद्योगिक विकासासाठी आरक्षित असून, त्या वनजमीन नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. याच परिसरात नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झालेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभा राहत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विमानतळाची तुलना इंग्लंडच्या 'हिथ्रो' विमानतळाशी केली होती. त्यामुळे हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावरचा अभिमान मानला जातो. परंतु आता वनखात्याच्या हालचालींमुळे या प्रकल्पासह जेएनपीटी बंदर, द्रुतगती महामार्ग, मोठे गृहप्रकल्प आणि औद्योगिक विकास क्षेत्रातील अनेक कामांवर अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. न्यायालयाने जर तात्पुरता स्थगिती आदेश लागू केला, तर अनेक प्रकल्प ठप्प पडू शकतात, अशी चिंता व्यक्त होत आहे.

### शहाड उड्डाणपुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद!

# दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु



**■उल्हासनगर। प्रतिनिधी,**

प्रतीक्षेनंतर अखेर दीर्घ कल्याण-मुरबाड महामार्गावरील शहाड उड्डाणपुलाच्या डांबरीकरण व दुरुस्तीच्या कामाला सोमवारच्या मध्यरात्रीपासून सुरुवात झाली आहे. या कामादरम्यान पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली असून, ३ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत कोणत्याही प्रकारची वाहतूक या मार्गावरून होणार नसल्याची माहिती उल्हासनगर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिरसाट यांनी दिली.

ठाणे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांच्या अधिसूचनेनुसार मध्यरात्री १२ वाजता वाहतूक बंदीची अंमलबजावणी करण्यात आली. काही मिनिटांतच यंत्रसामग्री, कामगार आणि अभियंते युद्धपातळीवर कार्यरत झाले. या दुरुस्तीच्या कामासाठी आमदार कुमार आयलानी यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि मे. संरचना कंपनी यांनी संयुक्त विद्यमाने उपक्रम हाती घेतला आहे. पुलावरील जुना डांबर थर काढून नवीन टिकाऊ थर बसविण्याचे काम सुरू आहे. त्याचबरोबर पुलाचे रेलिंग, लाइटिंग आणि इतर आवश्यक दुरुस्तीही करण्यात येणार आहे.

विभागाच्या काम २४ तासांच्या शिफ्टमध्ये सुरू असून रात्रीच्या वेळीही रोलर, कटिंग मशीन आणि क्रेनची अविरत हालचाल दिसत आहे. वाहतूक अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या वाहनांना शहाड पुलावरून प्रवास बंदी लागू असून, वाहनचालकांना पयार्यी मार्गांचा वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. पुलाजवळील चौकांवर दिशा फलक, बॅरिकेड्स, रिफ्लेक्टर आणि सूचना फलक बसवण्यात आले आहेत. वाहतूक विभाग आणि पोलिसांकडून विशेष मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे, जेणेकरून वाहतूक सुरळीत राहील आणि नागरिकांना कमीत कमी गैरसोय होईल.

# राज्यातील दोन कोटी कुटुंबांना दिलासा!

## तुकडेबंदी कायद्याच्या सुधारणा लागू... जमिनी होणार अधिकृत



**इस्लामपूरचे नाव आता 'ईश्वरपूर'**

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर (वाळवा तालुका) या शहराचे नाव बदलून 'ईश्वरपूर' असे करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या शिफारशीसह केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्याला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे आता इस्लामपूर शहर व नगर परिषदेचे नाव अधिकृतरीत्या 'ईश्वरपूर' असे करण्यात आले आहे. राज्य सरकारने यासंबंधीची अधिसूचना जारी केली आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्याचा अध्यादेश मंगळवारपासून राज्यात लागू करण्यात आल्याने, अकृषिक वापरासाठी परवानगी असलेल्या क्षेत्रातील जमिनींसाठी आता तुकडेबंदी कायदा लागू राहणार नाही, अशी क्रांतिकारी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. याबाबतचे राजपत्र जारी करण्यात आले असून, यामुळे आजवर तुकडेबंदी कायद्याविरुद्ध जमिनीचे झालेले व्यवहार नियमित केले जातील. त्यामुळे राज्यातील दोन कोटी कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, ''राज्यातील सुमारे ४९ लाख कुटुंबधारकांची जमीन (सुमारे दोन कोटी कुटुंबसदस्य असलेली) नियमित होईल. या सर्वांच्या सातबारावर नाव लागेल आणि नोंदणी होईल. या अध्यादेशामुळे १५ नोव्हेंबर १९६५ पासून ते १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंतच्या तुकड्यांचे झालेले हस्तांतरण हे कोणतेही शुल्क न भरता नियमित करता येईल.''

अध्यादेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सविस्तर कार्यप्रणाली पुढील सात दिवसांत महसूल विभागाकडून जारी केली जाईल. या निर्णयामुळे ले-आऊटमधील प्लॉटधारकांचे नाव मालकासह सातबारा उताऱ्यावर येणार आहे, ज्यामुळे मोठा गोंधळ दूर होईल, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यात अंमलात असलेला तुकडेबंदी कायदा हा मूळात शेती क्षेत्रासाठी लागू होता. किफायतशीर शेती करण्यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार (बागायती/जिरायती) आवश्यक असलेले प्रमाणभूत क्षेत्र या कायद्याने ठरवले होते. हा कायदा शहरी भागासाठी लागू नव्हता. मात्र, वाढत्या नागरीकरणामुळे लोकांनी शहराच्या किंवा गावांच्या सभोवताली असलेल्या क्षेत्रांमध्ये त्यांच्या गरजेपोटी, या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्रांचे खरेदी-विक्री व्यवहार केले. राज्यात अशा तुकड्यांची संख्या सुमारे ४९ लाख इतकी आहे. तुकडेबंदी कायद्याविरुद्ध झालेले हे अनियमित व्यवहार नियमित करण्यासाठी शासनाने दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५ रोजी अध्यादेश प्रसिद्ध केला असून, तो ३ नोव्हेंबर, २०२५ पासून अंमलात आलेला आहे.

# ठाणे-बोरीवली टनेलच्या कामाला गती... देशातील सर्वात लांब शहरी बोगदा

**प्रकल्पाची सद्यस्थिती**

- ठाणे बाजूच्या टनेल लॉन्चिंग शाफ्टचे उत्खनन ऑक्टोबर २०२४ मध्ये सुरू झाले असून, आता अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.
- कास्टिंग यार्ड (ठाणे) पूर्णत्वास गेले असून कार्यान्वित झाले आहे, तर बोरीवली यार्डची उभारणी सुरू आहे.
- जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया ठाणे येथे जवळपास पूर्ण झाली आहे, तर बोरीवलीतील स्थलांतरितांचे पुनर्वसन सुरू आहे.
- नायक आणि अर्जुन नावाच्या दोन टनेल बोरिंग मशिन्स चेन्नईतील कंपनीकडून मागवण्यात आल्या आहेत.

**■ठाणे। प्रतिनिधी,**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतलेला ठाणे - बोरीवली दुहेरी टनेल प्रकल्प आता जलदगतीने पुढे सरकत आहे. हा देशातील सर्वात मोठा आणि सर्वात लांब शहरी बोगदा ठरणार आहे. एकूण ११.८ किलोमीटर लांबीचा हा बोगदा ठाण्याच्या घोडबंदर रोडला वेस्टर्न एक्सप्रेस हायवेशी जोडणार आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर ठाणे ते बोरीवली प्रवासाचा कालावधी सध्याच्या ६० ते ९० मिनिटांवरून केवळ १५ मिनिटांवर येणार आहे.

हा बोगदा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणार असून, अत्याधुनिक टनल बोरिंग मशिन्सच्या साहाय्याने पर्यावरणपूरक व सुरक्षित पद्धतीने खोदकाम सुरू आहे. जमिनीच्या पृष्ठभागावर अल्प परिणाम होईल, अशी संपूर्ण यंत्रणा उभारण्यात आली आहे. प्रत्येक बोगद्यात तीन मार्गिका (लेन) असतील, त्यात एक आपत्कालीन लेन समाविष्ट असेल.

तसेच दर ३०० मीटर अंतरावर आपत्कालीन मार्ग असणार आहेत. आधुनिक वायुविजन प्रणाली, अग्निशमन सुविधा, धूर शोधक यंत्रणा आणि डिजिटल एलईडी दिशादर्शक फलक यांसारख्या



प्रगत सुरक्षा साधनांनी हा बोगदा सुसज्ज केला जाणार आहे.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होईल, प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात घटेल, प्रदूषणावरही नियंत्रण येईल. तसेच नागरिकांना अधिक स्मार्ट, जलद आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा अनुभव मिळेल. एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशातील आधुनिक शहरी वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने मोठे पाऊल मानले जाते.

# गरजू रुग्णांना राज्य सरकारचा मोठा दिलासा!

## आरोग्य योजनेचा राज्यात विस्तार... एकूण २,३९९ आजारांवर होणार उपचार

**सेवा समायोजनाच्या निर्णयात दुरुस्ती**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित पदावर समायोजन करताना सेवा प्रवेश नियमात दुरुस्ती न करता विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात आली. राष्ट्रीय आरोग्य अभियानातील १४ मार्च २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी १० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सेवांचे समायोजन करण्याबाबतचा निर्णय यापूर्वी घेतला होता. निर्णयात दुरुस्ती करून सेवांचे समावेशन सेवा प्रवेश नियमात दुरुस्ती न करता एक वेळची विशेष बाब म्हणून करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार १० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समकक्ष पदावर सेवा समायोजन सार्वनजिक आरोग्य विभागातील पदांबरोबर, ग्रामविकास विभागामार्फत भरण्यात येणारी आरोग्य सेवेतील रिक्त पदांवर करण्यात येणार आहे.



**■मुंबई। प्रतिनिधी,**

विस्तारित महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सध्या समाविष्ट असलेल्या उपचारांमध्ये वाढ करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. यानुसार ३४ विशेषज्ञ सेवांतर्गत १,३५६ उपचारांऐवजी आता ३८ विशेषज्ञ सेवांतर्गत एकूण २,३९९ आजारांवर उपचार होणार आहेत. यामुळे बहुतेक आजारांवर उपचार उपलब्ध होणार असल्याने, गरजूंना मोठा दिलासा मिळणार आहे.

विस्तारित महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत पॅकेजचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी गठित समितीने उपचारांमध्ये वाढ करण्यासह इतर शिफारसी केल्या होत्या. विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजने व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत एकूण २,३९९ उपचारांपैकी २२३ उपचार शासकीय रुग्णालयांकरिता राखीव ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**जन आरोग्य योजना, कार्ड वितरणासाठी २०४ कोटींची तरतूद**

महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत आयुष्यमान कार्ड निर्माण करणे व वितरण करणाऱ्या क्षेत्रीय स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

# वसई-विरारमधील टँकरमधून होणाऱ्या पाण्याच्या गळतीमुळे अपघाताचा धोका

यामुळे शहरातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या गळत्या टँकरमुळे विरार पूर्वेकडील नारंगी बायपास रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्याच्या मधोमध मोठं मोठे खड्डे पडले आहेत. काही महिन्यांपूर्वी याच रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. पण या टँकरमुळे हा रस्ता निकामी झाला आहे. या रस्त्यावर दरदिवशी अपघाताच्या घटना घडत आहेत.वसईत विरार परिसरात १ हजार हून अधिक टँकर पाणी सेवा पुरवत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे, पण हा आकडा अधिकृत नाही. परंतु तंदुरुस्ती दाखल्यासाठी आलेल्या १३६ टँकरची नोंद परिवहन विभागाकडे आहे. यामुळे शहरातील रस्त्यावर अनधिकृतरित्या टँकर माफिया सरसावला असल्याचे दिसून येऊ लागले आहे. अशा टँकरवर वाहतूक पोलिसांनी कारवाई करावी. तसेच वाहतूक परिवहन विभागाने मुदतकाळ संपलेले टँकर जप्त करावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



**■विरार। प्रतिनिधी,**

हिवाळा सुरू व्हायच्या आधीच वसई- विरारमधील नागरिकांना पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे पाणी टँकरच्या मागणीत पुन्हा वाढ झाली असून शहरातील रस्त्यांवर टँकरची संख्या वाढली आहे. बेदरकारपणे चालणाऱ्या या टँकरमधून सातत्याने पाण्याची गळती होत असल्याने रस्ते निसरडे होऊन अपघातांची शक्यता वाढली आहे. यामुळे गळत्या टँकरवर कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत. वाहतूक आणि पोलीस यांना अनेक वेळा मागणी करूनही टँकर वाहतुकीच्या वेळा मर्यादित झालेल्या नाहीत. तसेच वाहतूक पोलिसांना गळत्या टँकरवर कारवाई करण्याचे सुद्धा सांगितले होते. पण अद्यापही या बाबत कोणतीही कारवाई झाल्याचे दिसत नाही. केवळ चिरीमिरीच्या नादात वाहतूक पोलीस टँकरवर कारवाई करत नसल्याच्या तक्रारी आहेत.

# वाड्यात शेतकऱ्याला केवळ २ रुपये ३० पैसे नुकसान भरपाई

**■विरार। प्रतिनिधी,**

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील शिल्लोत्तर येथील शेतकरी मधुकर बाबुराव पाटील यांना भात पिकाच्या मोठ्या नुकसानीनंतर शासनाकडून फक्त २ रुपये ३० पैसे इतकी नुकसानभरपाई मिळाल्याने शेतकर्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या घटनेमुळे शासनाच्या भरपाई योजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीबद्दल शंका व्यक्त होत आहे. अतिवृष्टीमुळे शिल्लोत्तर परिसरातील भात पिकावर मोठा तडाखा बसला होता. दीर्घकाळ पडलेल्या पावसामुळे सोन्यासारखे आलेले भात पीक पाण्याखाली गेले आणि पूर्णपणे नष्ट झाले. त्याचबरोबर पेंढाही काळा पडल्याने जनावरांच्या चार्याची टंचाई निर्माण झाली आहे. पाटील यांची ११ एकर शेती असून, पत्नी आणि मुलींच्या नावावर प्रत्येकी काही एकर जमीन विभागलेली आहे. एवढ्या मोठ्या क्षेत्रात झालेले नुकसान लक्षात घेता, शासनाकडून मिळालेली दोन रुपयांची भरपाई ही थट्टा असल्याची भावना स्थानिक शेतकर्यांनी व्यक्त केली.या घटनेनंतर परिसरातील शेतकर्यांनी प्रशासनाविरुद्ध तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणामुळे जिल्ह्यातील इतर शेतकरीही अस्वस्थ झाले आहेत.

### हातावर मेहंदी लावून आल्या, विद्यार्थिनींना थेट वर्गाबाहेर हाकललं...

# मुंबईत कुठे घडला संतापजनक प्रकार?



**शिक्षण विभागाने बजावली नोटीस**

हा प्रकार समोर आल्यावर सर्व स्तरांतून संताप व्यक्त होत आहे. दरम्यान शिक्षण विभागाने या प्रकाराची तत्काळ दखल घेऊन शाळेच्या मुख्याध्यापिकेला नोटीस बजावली आहे. सेंट अँथनी शाळेतील हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याने या प्रकाराची शिक्षण निरीक्षक (उत्तर) डॉ. मुश्ताक शेख यांनी तत्काळ दखल घेऊन शाळेच्या मुख्याध्यापिकेला नोटीस बजावली. तसेच घडलेल्या या प्रकाराबाबत एका दिवसात खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या महिन्यात कल्याणमधील एका शाळेनेअजब पतवा काढला होता. विद्यार्थ्यांच्या कपाळाला टिळा लावण्यास तसेच हातात धागा बांधण्यास बंदी घालण्यात आली होती.

यामुळे मोठा गदारोळ माजला होता. ते प्रकरण शांत होतं ना होतं तोच आता मुंबईतील चेंबूर येथील एक शाळेतही संतापजनक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. हातावर मेहंदी काढून आल्याने १५ ते २० विद्यार्थिनींना थेट वर्गाबाहेर काढण्यात आलं. चेंबूरच्या सेंट अँथनी शआळेत हा भयानक प्रकार घडल्याचे समोर आले असून या विरोधात पालकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. शिक्षण विभागाने या प्रकाराची तत्काळ दखल घेऊन शाळेच्या मुख्याध्यापिकेला नोटीस बजावली आहे. नुकताच दिवाळीचा सण झाला. त्यानिमित्ताने अनेका जणी हातावर मेहंदी काढतात. लहान मुलींनाही मेहंदीची खूप हौस असते. दिवाळीच्या सुट्टीनंतर चेंबूरमधील सेंट अँथनी गर्ल्स हायस्कूलही सुरू झाली. या विद्यार्थिनी नेहमीपर्रमाणे शाळेत गेल्या, पण तिथे त्यांच्यासोबत हा संतापजनक प्रकार घडला.

काही मुलींच्या हातावरची मेहंदी पूर्णपणे गेली नवह्ती, काहींच्या हातांवर मेहंदी होती. मात्र त्या मुलींना थेट वर्गाबाहेर काढण्यात आलं. शाळेची नियमावली दाखवून त्यांचे हात तपासून वर्गाबाहेर काढण्यात आलं अशी माहिती समोर आली आहे. पण यामुळे पालकांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे. दोन दिवसांपूर्वी घडलेल्या या घटनेबाबत माहिती मिळताच स्थानिक पक्षसंघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या ही बाब लक्षात आली. यानंतर काल शाळा व्यवस्थापनाला जाब विचारला; मात्र त्यांनाही उलटसुलट उत्तरे देण्यात आल्याचे पालकांनी सांगितले.

**गर्दीवर नियंत्रण मिळवता येणार**

दररोज सुमारे सात लाख प्रवासी ठाणे स्थानकातून प्रवास करतात. सकाळी व सायंकाळी येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. पावसाळ्यात गर्दी नियंत्रणाबाहेर गेल्यास चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे गर्दीचे व्यवस्थापन, प्रवाशांची सुरक्षितता आणि भविष्यातील वाढत्या प्रवासीसंख्येचा विचार करून हा विस्तार प्रकल्प राबविण्यात येत आहे.

**प्रवाशांना सुलभ प्रवासाचा अनुभव मिळेल**

ठाणे स्थानकावरील विस्तारकाम टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे. १५ डब्यांच्या लोकलसाठी आवश्यक सुविधा उभारल्यानंतर प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल अशी शक्यता प्रवाशांनी व्यक्त केली आहे. ही कामे डिसेंबर अखेर किंवा जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या विस्तारामुळे ठाणे स्थानकावरील गर्दीचे व्यवस्थापन सुकर होईल आणि प्रवाशांना अधिक सुरक्षित, सोयीस्कर व सुलभ प्रवासाचा अनुभव मिळेल, अशी अपेक्षा आहे.

# ठाणे स्थानकाच्या विस्तारीकरणाला प्रारंभ

## १५ डब्यांच्या लोकलसाठी फलाटांची लांबी वाढविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू

**■ठाणे। प्रतिनिधी,**

मध्य रेल्वेवरील सर्वाधिक वर्दळीच्या ठाणे स्थानकावर प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने स्थानक विस्ताराचे काम हाती घेतले आहे. विशेषतः धीम्या मार्गिकेवरील फलाट क्रमांक२, ३ आणि ४ यांची लांबी वाढविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या विस्तारामुळे लवकरच या फलाटांवर १५ डब्यांच्या लोकल गाड्यांना थांबा देता येणार असल्यामुळे प्रवाशांची गदीर्पासून सुटका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मध्य रेल्वे मार्गावर एक्स्प्रेस, वातानुकुलित आणि सामान्य लोकल गाड्यांची वाहतूक होत असते. एक्स्प्रेस गाड्यांसाठी ५,६,७ आणि ८ मार्ग देण्यात आले आहे. त्याचबरोबर ५ आणि ६ स्थानकावरून जलग लोकल गाड्या धावत असल्यामुळे त्या स्थानकांची लांबी आधीच



वाढविण्यात आली आहे. मात्र सध्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता १५ डब्यांच्या लोकलची मागणी मोठ्या प्रमाणात केली जात आहे. तसेच सध्या या फलाटांची लांबी कमी असल्याने १५ डब्यांच्या लोकल गाड्या पूर्णपणे थांबविणे शक्य होत नव्हते. परिणामी प्रवाशांना चढण्या-उतरण्यात अडचणी निर्माण होत होत्या. तसेच गदीर्मुळे अनेक प्रवाशांचे जीव गेल्याच्या घटना घडत असतात. या समस्येचा कायमस्वरूपी तोडगा म्हणून रेल्वे प्रशासनाने प्लॅटफॉर्म वाढविणे, उंची वाढविणे आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याचे काम सुरू केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

खासकरून धीम्या गतीच्या स्थानकावर १५ डब्यांच्या लोकल धावतील या उद्देशाने फलाट क्रमांक २, ३ आणि ४ यांची लांबी वाढविण्याचे काम सुरू असून प्लॅटफॉर्म उंचावणे आणि नवीन फरशी टाकण्याची प्रक्रिया सुरू आहे. यासाठी रेल्वेने कामगारांची विशेष पथके नियुक्त केली असून, दिवसरात्र काम चालू ठेवून प्रवासी हालचालीवर परिणाम होऊ नये, याची खबरदारी घेतली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com